दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

## शिर्डी ग्रो मोअर घोटाळा : संचालक संदीप सावळे अटक

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील राहता तालुक्यातील शिर्डी येथे 'ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स' कंपनीने गुंतवणुकीवर उच्च परतावा देण्याच्या आमिषाने शेकडो नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक केल्याचा घोटाळा उघडकीस आला. ४ जुलै २०२५ रोजी पहिली तक्रार नोंदवली गेली. मुख्य सूत्रधार भूपेंद्र राजाराम सावळे व सहकाऱ्यांनी बनावट कंपन्या उभारून ७२३ कोटींचे व्यवहार केले. भूपेंद्रला १६ जुलैला अटक झाली. तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवला गेला. १२ नोव्हेंबरला भूपेंद्रविरोधात १७५० पानांचे दोषारोपपत्र दाखल. संदीप भास्कर सावळे (४३) व इतर सात आरोपी पसार होते. १ डिसेंबरला आर्थिक गुन्हे शाखेने संदीपला अटक केली. मनी ट्रेल तपास सुरू असून, गुंतवणूकदारांना न्यायाची अपेक्षा व्यक्त केली.

• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ७ वे • अंक ५५ • बुधवार, ०३ डिसेंबर २०२५ • पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 • पाने ८ • मूल्य रु. ४.००

# मतदान संपले, तणाव कायम

## नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकीसाठी शांततेत मतदान



संगमनेर नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान केल्यानंतर आ.सुधीर तांबे, डॉ.मैथिली तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, हर्षल तांबे व परिवार.



राहुरी नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजाविताना माजी मंत्री प्राजक्त तनपुरे

### ■ २० दिवसांत मतपेटीचे काय होईल?

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीतील ईव्हीएम प्रकरणी गंभीर संशय व्यक्त केला. मतदान आज झाले, पण निकाल २० दिवसांनी लागणार. इतके दिवस मतपेट्या कोणाकडे राहणार, त्यांचे काय होईल, याची खात्री कुठे? असा सवाल त्यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला. न्यायालयीन प्रक्रियेमुळे निकाल लांबल्याचा दाखला देत थोरात म्हणाले, ईव्हीएम सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे, पण इतका मोठा कालावधी शंकास्पद आहे. संगमनेरसह जिल्ह्यातील महत्त्वाच्या पालिकांमध्ये काँग्रेसची ताकद असल्याने हा मुद्दा पक्षाने आक्रमकपणे मांडण्याची तयारी दिसते.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रभरातील २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींपैकी (२४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती) मंगळवारी २६४ पालिकांचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान शांततेत पार पडले. सकाळी ७:३० वाजता सुरू झालेल्या या प्रक्रियेत मतदारांनी उत्साहाने सहभाग घेतला, मात्र काही ठिकाणी वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या समर्थकांमध्ये झालेल्या हाणामारीमुळे आणि नियमांच्या उल्लंघनामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबर २०२५ रोजी लागणाऱ्या निकालाकडे लागले आहे. राज्यातील विविध भागात मतदान केंद्रांवर सकाळपासून नागरिकांचा उत्साही प्रतिसाद असून सुरक्षेची तरतूद आणि प्रशासनाची व्यवस्थाही चोख करण्यात आली आहे. यावेळी मतदारांनी आपला हक्क बजावण्यासाठी सकाळपासूनच मतदान केंद्रांवर गर्दी करतानाचे दृश्य पाहायला मिळाले.सध्याच्या निवडणुकीत काही नगरपालिका आणि सदस्यांच्या निवडणुकीसंदर्भातील काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित **(पान ४ वर)**

# निकालासाठी २१ डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा!

## उच्च न्यायालयाचा निर्णय; उर्वरित नगरपालिकांच्या निवडणुकांची तयारी सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर / अहिल्यानगर :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रारंभी राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबर या दिवशी मतदान आणि ३ डिसेंबर या दिवशी निकाल घोषित केला होता; मात्र काही नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्यात न्यायालयीन पेच निर्माण झाल्याने आयोगाने कार्यक्रमात पालट करत ज्या ठिकाणी वाद चालू आहे, तेथे २० डिसेंबर या दिवशी मतदान आणि २१ डिसेंबर या दिवशी निकाल, असा नवीन आदेश दिला आहे. याच पार्श्वभूमीवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने ३ डिसेंबरची मतमोजणी रहित करून ती २१ डिसेंबर या दिवशी सर्व ठिकाणचा निकाल घोषित करण्यात यावा, असा निकाल दिला आहे. तोपर्यंत आचारसंहिता कायम राहील.

खंडपिठाने १ डिसेंबर या दिवशी झालेल्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या अधिवक्त्यांना थेट विचारणा केली होती, 'सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल २१ डिसेंबर या दिवशी देता येतील का ?'

आयोगाच्या अधिवक्त्यांनी यावर तात्काळ उत्तर न देता '२ डिसेंबरच्या दुपारी या संदर्भातील निवेदन सादर करू', असे सांगितले होते. त्यानुसार आता न्यायालयाने सर्वच ठिकाणचा निकाल २१ डिसेंबर दिवशी घोषित करण्यास सांगितले आहे. 'निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व सिद्धता पूर्ण केल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयाकडे सादर केले होते. मतदान असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये यंत्रणा केंद्रावर पोचली असून कर्मचाऱ्यांनी सिद्धता दर्शवली आहे. त्यामुळे मतदान थांबवणे योग्य नाही', असे मत न्यायालयाने स्पष्ट केले.

निकालाचा दिनांक पुढे ढकलल्यास जनतेच्या मनातील संभ्रम आणि राजकीय तणाव यांवर अधिक परिणाम होऊ शकतो, असे निरीक्षणही न्यायाधिशांनी नोंदवले होते. त्यानुसारच न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

### झापुक । zupuk

कलियुगात सत्य
आणि प्रामाणिकपणाची
वाट लागली
दांभिक,खोटे
वागणाऱ्यांची
चलती झाली

**नवनाथ कुताळ, 9422231825**

### महत्वाचे...

#### बंगळुरूला बॉम्बस्फोटाची धमकी, प्रशासन अलर्ट मोडवर

**बंगळुरु :** शहराच्या पोलीस आयुक्तांना ३० नोव्हेंबरला एक धमकीचा ईमेल आला आहे. त्या मेलमध्ये जैश-ए- मोहम्मदच्या व्हाइट कॉलर टेरर टीमनं केम्पेगौडा इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि शहराच्या विविध भागातील मॉल्स ओरिअन मॉल, लुलू मॉल, फोरम साऊथ मॉल आणि मंत्री स्केअर येथे बॉम्ब स्फोटाची धमकी देण्यात आली आहे. ईमेल मोहित कुमार नावावरुन पाठवण्यात आला होता, त्यात ७ वाजता स्फोट करण्याचा इशारा देण्यात आला होता. बॉम्ब स्फोटाची धमकी मिळताच पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १७३ नुसार केस दाखल करण्यात आली आहे. सर्व संवदेशनशील ठिकाणांवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दिल्लीत १० नोव्हेंबरला कार ब्लास्ट झाला होता. तेव्हापासून सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. दोन्ही मध्ये व्हाइट कॉलर टेरर मॉड्यूलचा उल्लेख असल्यानं सुरक्षा यंत्रणा अलर्टवर आहेत.बंगळुरुला या वर्षाच्या सुरुवातीला धमक्यांचे अनेक मेल आले होते. शहरातील काही शाळांना धमक्यांचा मेल आला होता. जे नंतर फेक असल्याचं समोर आलं होते. सातत्याने धमक्या येत असल्याने सुरक्षा यंत्रणा पुन्हा एकदा हाय अलर्टवर आहेत.

# मतदान गोपनीयतेचा भंग

## आमदार संतोष बांगर यांच्यावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे कळमनुरीचे आमदार संतोष बांगर हे अडचणीत आले आहेत. मतदान केंद्रात मतदानाच्या गोपनीयतेचा भंग केल्याचा व आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप बांगर यांच्यावर झाला असून याप्रकरणी हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बांगर यांना फटकारलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगोली शहरातील बाजार परिसरातील मतदान केंद्र क्रमांक ३ येथे संतोष बांगर मतदानासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी एका महिला मतदाराला ईव्हीएमवर कोणतं बटन दाबायचं, याबाबत सांगितलं. इतकंच नाही, तर मतदान केंद्रात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंचा विजय असो व एकनाथ शिंदे आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं अशी घोषणाबाजीही केल्या. तसंच बांगर यांनी मोबाईल फोनचा वापरही केला.

> किमान लोकप्रतिनिधींनी लोकशाहीची चाड ठेवली पाहिजे. निवडणुकीत आपण कसं वागतोय, आपण कोणता संदेश देतोय याचा विचार केला पाहिजे,
>
> **-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

मतदान केंद्रात घोषणाबाजी करणे, फोन वापरणे किंवा मतदाराला मतदानाविषयी सूचना देणं, हे मतदानाच्या गोपनीयतेचा भंग व आचारसंहितेचं गंभीर उल्लंघन मानलं जातं. आमदार संतोष बांगर यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मतदानाच्या गोपनीयतेचा भंग झाल्याचं आढळल्यास आमदार बांगर यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल, असा अहवाल मागवण्यात आला होता. आता या प्रकरणात आमदार संतोष बांगर यांना मोठा धक्का बसला आहे.

# कौमार्य चाचणी, भस्माची पुडी अन् जादुटोणा

## नेहा पवार मृत्यूप्रकरणी मांत्रिकाला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** पंचवटी येथील नेहा पवार हिने सात पानी चिठ्ठी लिहून आपल्या आयुष्याची अखेर केली होती. तिने जीव दिल्याच्या अनेक कारणांपैकी एक अंधश्रद्धा हे सुध्दा कारण समोर आले होते. पंचवटी पोलिसांनी त्यादृष्टीने तपास करुन हिरवाडी येथून एका मांत्रिकाला अटक करण्यात आली आहे. मयत नेहा पवार हिच्या मृत्यूमागे कौमार्य चाचणी आणि जादुटोण्याचे कारण असून त्याचा पोलिसांनी तपास करावा, असे महाराष्ट्र अंनिस व विधान परिषदेच्या उप सभापती नीलम गोऱ्हे यांनी पोलिसांच्या लक्षात आणून दिले होते. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपी संतोष पवार याच्या घराची झडती घेतांना जादुटोणाचे विशिष्ट साहित्य मिळून आले होते. ज्यात नागाचा आकार असलेल्या खिळ्याला काळा बिबा आरपार केलेला आढळला. हे साहित्य कुठून आणले, अशी पोलिसांनी संशयित आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी भोंदुबाबाचे नाव सांगितले.मयत नेहा पवार ही माहेरवरुन राखेसारखी भस्माची पुडी आणत होती. त्यामुळे घरात अडचणी येतात. त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी व नेहाला भिती घालण्यासाठी जादुटोणा केल्याचे आरोपी संतोष पवार व जिजाबाई पवार यांनी सांगितले. त्यानुसार, पोलीस निरीक्षक सुनील पवार यांनी नाशिकच्या हिरवाडी येथुन सुनिल बबन मुंजे (वय ४२ वर्ष) या मांत्रिकाला सोमवारी रात्री अटक केली.

तो त्याच्या राहत्या घरी मंदिर व दरबार करुन लोकांच्या समस्यांवर दैवी व अघोरी इलाज करण्याचे काम करत तो होता. त्याने गुन्ह्यांची कबूली दिली आहे. पोलिसांनी त्याला सहआरोपी बनविले असुन जादुटोणा विरोधी कायद्याचे कलम देखील लावण्यात आले आहेत. न्यायालयात त्याला हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक सुनील पवार करत आहे. तर, सदर भोंदुबाबाने आणखी कुणाला फसविले आहे का त्यादिशेने देखील आता पंचवटी पोलिस तपास करत आहे. तर लोकांनी अशा अंधश्रद्धायुक्त प्रकारांपासुन दुर रहावे. कुणाची फसवणूक झाली असल्यास अंनिस किंवा पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# नगरमध्ये तीन मजली इमारतीला भीषण आग

## ए एस मार्केटिंगचे गोदाम जळून खाक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहराच्या मध्यवर्ती परिसरातील बुरुड गल्ली या ठिकाणी मंगळवारी पहाटे ६.३० ते ७.०० वाजण्याच्या सुमारास एका तीन मजली जुन्या इमारतीला भीषण आग लागली. चंगेडिया यांच्या मालकीच्या इमारतीत असलेल्या ए एस मार्केटिंगचे मोठे गोदाम या आगीत जळून खाक झाले.

सकाळच्या वेळी व्यायाम करणाऱ्या नागरिकांना दुकानातून धूर येत असल्याचे दिसल्याने एकच खळबळ उडाली. सदर परिसरात लाकडी वस्तू व बांबूचा व्यवसाय असल्याने, तसेच गोदामात कॅडबरीसह किरकोळ मालाचा साठा असल्याने आगीने काही क्षणातच विकराळ रूप धारण केले.

ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

दरम्यान महापालिकेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन विभागाची गाडी



तातडीने पोहोचली. परंतु, सुरुवातीला आगीने रौद्र रुप धारण केल्याने महानगरपालिकेचे अग्निशमन दल आग विझविण्यात अपयशी ठरत होते. तसेच शटर तोडण्यासाठी हातोडे, ब्रेकर यांसारख्या अत्यावश्यक साधनांचा अभाव होता, अशी तक्रार नागरिकांनी केली. मनपाची यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र होते.परिस्थितीचे गांभीर्य पाहून आमदार संग्राम जगताप यांनी तात्काळ सैन्य दलातील **(पान ४ वर)**

# भरत गोगावलेंच्या मुलावर रिव्हॉल्व्हर रोखली

## राष्ट्रवादीच्या सुशांत जाबरेंना जबर मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**महाड :** रायगड जिल्ह्यातील महाड नगरपरिषदेसाठी आज मतदान पार पडत आहे. एका मतदान केंद्रावर भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांच्यावर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सुशांत जाबरे यांनी रिव्हॉल्व्हर रोखल्याची तक्रार करण्यात आली. यावेळी गोगावले आणि सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये तुफान हाणामारी झाली. यामध्ये सुशांत जाबरे आणि त्यांच्या अंगरक्षकाला भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांच्या समर्थकांनी जबर मारहाण केली. विकास गोगावले यांच्या समर्थकांनी सुशांत जाबरे यांच्या समर्थकांच्या अनेक गाड्यांची तोडफोड केली. त्यामुळे महाडमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. महाड पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणली.



महाडच्या नवे नगर परिसर ही हाणामारी झाली. सुशांत जाबरे यांनी निवडणुकीपूर्वी शिंदे गटाला सोडचिठ्ठी देऊन अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मंगळवारी सकाळपासून महाड नगरपरिषदेच्या मतमोजणीला सुरुवात झाली. त्यावेळी अनेक ठिकाणी ईव्हीएम यंत्र बंद पडली होती. त्यामुळे गोगावले आणि जाबरे यांच्या समर्थक एका मतदान केंद्रांवर जमले होते. यावेळी दोन्ही गटांमध्ये बाचाबाची होऊन तुफान हाणामारी सुरु झाली. गोगावेल समर्थकांनी दगडफेक करुन सुशांत जाबरे यांच्या **(पान ४ वर)**

### सुनील तटकरेंनी गुंड पाठवून षडयंत्र रचले

विकास गोगावले आणि आमच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करणारे गुंड हे सुनील तटकरे यांनीच पाठवले होते. जे आम्हाला गुंड म्हणतात, तेच स्वतः गुंड पाठवून षडयंत्र रचत आहेत. आम्ही कोणती दंडेलशाही करत नाही. आमच्या कार्यकर्त्यांवर हत्यारे घेऊन हल्ला करण्यासाठी गुंड पाठवले गेले. जशास तसे उत्तर आमच्या कार्यकर्त्यांनी दिलं आहे. पोलिस चौकशीनंतर या घटनेचा तपास केला जाईल. आमच्यावर हत्यारे घेऊन येणाऱ्या या हल्लेखोरांची चौकशी सर्वांसमोर येईल.

**– भरत गोगावले, मंत्री**

# आठ पालिकांच्या कारभाऱ्यांचे भवितव्य मतदानयंत्रात बंदिस्त!

## अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणूक शांततेत ; निकालासाठी १९ दिवस प्रतीक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील आठ नगरपरिषदांसाठी आज मतदान पार पडले. जिल्ह्यातील एकूण १२ नगरपरिषद व एका नगरपंचायतीसाठी निवडणूक जाहीर झाली असली तरी कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी व नेवासा या चार पालिकांच्या निवडणुका न्यायालयीन प्रक्रियेमुळे स्थगित झाल्या आहेत. उर्वरित आठ पालिकांमध्ये शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली असून, मतदारांच्या उत्साहाने राजकीय पक्षांच्या गोटात उत्सुकता वाढली



आहे. जिल्ह्यातील एकूण १ लाख ७० हजारांहून अधिक मतदारांसाठी १५० हून अधिक मतदान केंद्रांवर सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची प्रक्रिया सुरू होती. दुपारी १.३० पर्यंतच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात सरासरी ३५.५८ टक्के **(पान ४ वर)**

### ● जामखेड : सभापती शिंदे, आमदार पवारांची प्रतिष्ठा पणाला

सर्वाधिक रंगतदार लढत. विधानपरिषद सभापती राम शिंदे (भाजप) व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची प्रतिष्ठा पणाला. सर्व पक्ष स्वतंत्र लढत असून, नगराध्यक्षपदासाठी चार प्रमुख उमेदवार: प्रांजल अमित चिंतामणी (भाजप), संध्या शहाजी राळेभात (राष्ट्रवादी शरद पवार), पायलताई आकाश बाफना (शिवसेना शिंदे), सुवर्णा महेश निमोणकर (राष्ट्रवादी अजित पवार). मुख्यमंत्र्यांनी भाजपसाठी सभा घेतली तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या प्रचारात हातभार लावला. रोहित पवारांना तळ ठोकावा लागला असून, अपक्षांचा फॅक्टर महत्त्वाचा ठरेल.

## चर्चेतील लढती :

### ● श्रीरामपूर : विखे पाटलांनी प्रतिष्ठेची केलेली निवडणूक

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी प्रतिष्ठेची केलेली निवडणूक म्हणून श्रीरामपूर नगरपरिषद निवडणुकीकडे पाहिले गेले. नगराध्यक्षपदासाठी काँग्रेसकडून माजी आमदार जयंतराव ससाणे यांचे चिरंजीव करण ससाणे, भाजप-राष्ट्रवादी पॅनलकडून माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास बिहानी, शिवसेना (शिंदे) कडून प्रकाश चित्ते (पूर्वाश्रमीचे भाजप कार्यकर्ते) व शिवसेना (ठाकरे) कडून अशोक थोरे. विखे-पाटील यांच्या प्रभावाने ही लढत चर्चेत राहिली. विधानसभेतील मुस्लिम एक गठ्ठा मतदान यावेळीही काँग्रेसला यश मिळवून देणार का? याबाबत उत्सुकता आहे.

### ● संगमनेर : आमदार पत्नी विरुद्ध आमदार भावजई....

विधानसभा पराभवानंतर बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची पुनरागमनाची परीक्षा म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. मात्र नगराध्यक्षपदासाठी मैथिली सत्यजित तांबे (विद्यमान आमदार सत्यजित तांबे यांच्या पत्नी) यांनी अपक्ष उमेदवारी केली आहे. त्यांच्याविरुद्ध सुवर्णा संदीप खताळ (भाजप-शिवसेना युती, आमदार अमोल खताळ यांच्या भावजई). विखे-पाटील व खताळ यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची लढत. चाळीस वर्षांनंतर विधानसभेतील बदल पालिकेत होणार का, याकडे लक्ष लागले आहे. प्रचारात थोरात यांचा सक्रिय सहभाग होता.

# संपादकीय..

## नि'अडवणूक' आयोग :

## लोकशाहीला बदनाम करणारी विलंबाची साखळी

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे सध्या एका करुण कॉमेडीचे रूप घेतल्या आहेत. ओबीसी आरक्षणाच्या गोंधळामुळे मुदत संपलेल्या नगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदांपासून ते महापालिकांपर्यंत सर्वच संस्थांचे प्रशासकीय राजवट कायम आहे. जानेवारी २०२५ अखेरपर्यंत या निवडणुका पूर्ण करायच्या आहेत, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. पण राज्य निवडणूक आयोगाने जे वेळापत्रक जाहीर केले ते इतके घाईगडबडीचे आणि त्रुटींनी भरलेले आहे की, सुरुवातीला नगरपालिका निवडणुकांचाच बोजवारा उडाला. परिणामी काही ठिकाणी निवडणुका पुढे ढकलाव्या लागल्या, मतमोजणी स्थगित झाली आणि उच्च न्यायालयाला पुन्हा हस्तक्षेप करावा लागला. या सगळ्या प्रक्रियेत उमेदवारांचा विश्वास ढासळला, पैसा वाया गेला आणि लोकशाहीची प्रतिमा मलीन झाली. याला जबाबदार कोण? राज्य निवडणूक आयोगाचा हा सततचा गलथान कारभार!

निवडणुका उशिरा का लागल्या याची मूळ कारणे आयोगालाच माहीत असावीत. सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२४ मध्येच ट्रिपल टेस्ट पूर्ण करून जानेवारीअखेर निवडणुका घ्या, असे स्पष्ट बजावले होते. तरीही आयोगाने डिसेंबरअखेरपर्यंत आरक्षण निश्चित केले नाही. ट्रिपल टेस्टचा डेटा अपूर्ण होता, एम्पिरिकल डेटा संकलनात दिरंगाई झाली. परिणामी ओबीसींचे २७ टक्के आरक्षण रद्द झाले आणि डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात आयोगाला वार्डरचना व आरक्षण जाहीर करावे लागले. इतक्या कमी वेळेत उमेदवारांना तयारी करणे अशक्य होते. तरीही आयोगाने घाईत नगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम २४ डिसेंबरला जाहीर केला. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची मुदत २६ डिसेंबर ते १ जानेवारी, छाननी २ जानेवारी, माघार ४ जानेवारी आणि मतदान १६ जानेवारी असे वेळापत्रक ठेवले. म्हणजे नववर्षाच्या सुट्ट्या, बँकांच्या सुट्ट्या यात उमेदवारांना फक्त तीन-चार प्रभावी दिवस मिळाले! अपक्षांना तर हमखास नुकसान.

या घाईगडबडीत आयोगाच्या चुका उघड्या पडल्या. काही नगरपालिकांमध्ये प्रभागांच्या संख्येत बदल केले, काही ठिकाणी वार्डरचना चुकीची आली, काही ठिकाणी आरक्षण सोडत अजूनही अपूर्ण होती. परिणामी औरंगाबाद, लातूर, परभणी, सोलापूरसह अनेक नगरपालिकांमध्ये नामनिर्देशनच योग्य रीतीने भरता आले नाही. अपक्ष उमेदवारांना हमीपत्र, जात प्रमाणपत्र जोडण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना (उद्धव व शिंदे गट) यांच्यासह सर्वच पक्षांनी आक्षेप नोंदवले. अपक्ष उमेदवारांनी तर थेट उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने काही नगरपालिकांमधील विशिष्ट प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा आणि संपूर्ण मतमोजणी २ फेब्रुवारीपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय दिला. म्हणजे आयोगाच्या चुकीमुळे पुन्हा न्यायालयाच्या दारात!

हा एकट्या नगरपालिकांचा प्रश्न नाही. आयोगाने आधी नगरपालिका, नंतर जिल्हा परिषद-पंचायत समिती आणि शेवटी महापालिका असे टप्प्या-टप्प्याने निवडणुका घेण्याचे नियोजन केले आहे. पण पहिल्याच टप्प्यात पाणी सोडले तर उरलेल्या निवडणुकांचा काय भरवसा? मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक या महापालिकांचे प्रशासकीय राजवट आधीच दोन-अडीच वर्षे लांबले आहे. त्यांचा कार्यक्रम तर फेब्रुवारी-मार्चमध्ये येणार. त्याआधीच आयोगाची विश्वासार्हता संपली आहे.

सर्व पक्षांनी आयोगाच्या या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोग निवडणुका घेण्याऐवजी न्यायालयात फिरत आहे असे म्हटले तर राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांनी आयोग सरकारच्या दबावाखाली काम करतो आहे असा आरोप केला. शिवसेना (उद्धव) चे संजय राऊत यांनी तर थेट आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. अगदी सत्ताधारी शिंदे गटालाही आयोगाच्या नियोजनाचा फटका बसला आहे. म्हणजे सर्वच पक्ष एकमताने आयोगाला धारेवर धरत आहेत.खरे तर निवडणूक आयोग हे संवैधानिक संस्था आहे. त्याची जबाबदारी निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेत निवडणुका घेणे ही आहे. पण गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत आयोगाची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली आहे. २०२१ मध्येच ओबीसी आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा आयोगाने तात्काळ पावले उचलायला हवी होती. पण वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून, न्यायालयाच्या आदेशानंतरही घाईगडबड करून आयोगाने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. उमेदवारांचा खर्च दुप्पट-तिप्पट झाला, प्रचाराचा वेळ वाया गेला, जनतेच्या पैशावर चालणाऱ्या या संस्था प्रशासकांच्या भरणपोषणाचा खर्च वाढला. आणि सर्वांत मोठे नुकसान म्हणजे लोकशाहीवरचा विश्वास ढळला.

आता तरी राज्य निवडणूक आयोग जागा होईल का? उरलेल्या जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकांसाठी पुरेसा वेळ देऊन, पारदर्शक वार्डरचना व आरक्षण करतील का? की पुन्हा न्यायालयाच्या दारात हजेरी लावायची? महाराष्ट्राच्या जनतेला आता प्रशासक नव्हे, तर निवडून आलेले लोकप्रतिनिधी हवे आहेत. त्यासाठी आयोगाला आपली कार्यपद्धती सुधारावीच लागेल. अन्यथा लोकशाहीचा हा चौथा स्तंभ केवळ एक निवडणूक टाळण्याची यंत्रणा म्हणूनच ओळखला जाईल. वेळ आहे, आयोगाने सावध होण्याची!

## श्रीरामपुरात पहिल्यांदाच 'महाराष्ट्र गौरव रत्न' सुवर्ण सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** श्रीरामपुरात पहिल्यांदाच राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गौरव रत्न' सुवर्ण सोहळा ७ डिसेंबर रोजी गोविंदराव आदिक सभागृहात भव्यदिव्य वातावरणात होणार आहे. विद्याराज फाउंडेशनतर्फे आयोजित या सोहळ्यात साहित्य, कला, अभिनय, संगीत, समाजकार्य, शिक्षण, पत्रकारिता, वैद्यकीय सेवा व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव केला जाणार आहे.

सुमारे १०००-१५०० प्रेक्षक उपस्थित राहणार असून सजावट, ध्वनी, प्रकाशयोजना आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची जोरदार तयारी सुरू आहे. लावणी सम्राज्ञींची लावणी आणि सुवर्ण पदक विजेते संगीतकारांचा विशेष कार्यक्रम आकर्षण ठरणार आहे.

प्रमुख आयोजक सुनील ईश्वर पाटील यांनी हा सोहळा महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा तेजस्वी आरसा ठरेल असे सांगत श्रीरामपूरकरांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम श्रीरामपूर आणि अहिल्यानगरच्या सांस्कृतिक वैभवाला नवे स्थान देणारा ठरेल.

# संजीवनी सैनिकीचे ब्रास बँड पथक राज्यात प्रथम,

## विभागीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** भारत सरकारच्या शैक्षणिक मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, नवी दिल्ली आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय ब्रास बॅन्ड स्पर्धा २०२५-२६ मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने पुन्हा एकदा राज्यातील अव्वल क्रमांक पटकावला.




अप्रतिम, शिस्तबद्ध आणि कलात्मक सादरीकरणाच्या जोरावर संजीवनीच्या ब्रास बॅन्ड पथकाने प्रथम क्रमांक मिळवत, ग्रामीण भाग असूनही आम्ही कुणापेक्षा कमी नाही हे सिद्ध केले. सलग दुसऱ्या वर्षी राज्य विजेतेपद पटकावून संजीवनीने पुन्हा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आता संजीवनीचा संघ देशपातळीवरील विभागीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

स्पर्धेत राज्यभरातील एकूण ३७ संघांनी सहभाग नोंदवला होता, ज्यातील बहुतांश संघ हे महानगर क्षेत्रातील होते. त्यापैकी सात संघ अंतिम फेरीत पोहोचले, ज्यात ग्रामीण भागातील संजीवनीचाही समावेश होता. इयत्ता १० वीचा कॅडेट विपुल दिपक वाघ याच्या नेतृत्वाखाली ३७ कलाकारांनी शास्त्रशुद्ध आणि शिस्तबद्ध परफॉर्मन्स देत परीक्षकांच्या सर्व कसोट्या पार केल्या आणि राज्य विजेतेपदाची मोहर उमटवली. पश्चिम विभागीय स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश, राजस्थान, दादरा नगर हवेली, दीव दमण या राज्य व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश असणार आहे.

या स्पर्धेतही विजेतेपद मिळवण्याचा निर्धार संजीवनीच्या पथकाने व्यक्त केला असून सध्या त्यांचा सराव जोरात सुरू आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे आणि विश्वस्त सुमित कोल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच नॉन-अकॅडमिक डायरेक्टर डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर, संगीत शिक्षक महेश गुरव, कॅम्पस ॲडमिन विजय भास्कर आणि धोरण व वाढ अधिकारी आसिफ सय्यद यांचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## दत्त जयंती निमित्त कोकमठाण येथे विविध कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** कोकमठाण येथे दत्त जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक राजेंद्र जाधव यांनी दिली आहे.

गुरूवार दि. ४ डिसेंबर रोजी सायं. ५ ते ७ वा. रामेश्वर महाराज यांचे किर्तन व रात्री ९. वा. गायनाचा कार्यक्रम होईल. प्रमुख उपस्थितीत स्वरूपानंद महाराज व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. सदर कार्यक्रमास रमेशगिरी महाराज शिवाजी गांगुर्डे, विवेक कोल्हे, खा. भाऊसाहेब वाकचौरे , विश्वनाथ शेट्टी, साईबाबा एम्प्लॉईज सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांचे प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एकलव्य प्रतिष्ठाण, शिर्डी रूई एकलव्य प्रतिष्ठाण कोकमठाण माळवाडी, रेलवाडी, तिनचारी, कारवाडी भजनी मंडळ व समस्त जाधव परिवार तसेच कोकमठाण ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

# प्रवरेच्या दोन विद्यार्थ्यांची सिजेंटा फाउंडेशन इंडिया कंपनीत निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ एग्रीकल्चर अँड डेअरी सायन्सेस महाविद्यालयातील विद्यार्थी निखिल शिरसाठ आणि शुभम हळनोर यांची सिजेंटा फाउंडेशन इंडिया या नामांकित कंपनीमध्ये असिस्टंट व्हेटरनरी ऑफिसर पदावर निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य प्रा. सुरज जोंधळे यांनी दिली.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय विविध उपक्रम राबवत आहे. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्तींची मार्गदर्शन व्याख्याने, कृषी तंत्रनिकेतन व डेअरी पदविका आधारित औद्योगिक कंपन्यांमध्ये प्रशिक्षण व भेटी, माजी विद्यार्थी संवाद, शिवार फेरी इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.सुरज जोंधळे व ट्रेनिंग प्लेसमेंट समन्वयक प्रा.जगदीश ब्राह्मणे यांचे मार्गदर्शन लाभले.



विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील,माजी मंत्री आणासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील, पद्मश्री डॉ. विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ.उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले

# ना पांढरे पट्टे, ना फलक

## गतिरोधकांमुळे वाहनचालक त्रस्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा:** पुणतांबा-श्रीरामपूर या अंदाजे १९ किमी लांबीच्या राज्य मार्ग क्रमांक ३६ वर मोठ्या प्रमाणात असलेल्या अनावश्यक व अयोग्य पद्धतीने घालण्यात आलेल्या गतिरोधकांमुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत. या मार्गावर एकूण सुमारे २५ गतिरोधक असून, त्यापैकी श्रीरामपूर येथील पुणतांबा स्टँड ते गोंधवणी दरम्यान १३ आणि गोंधवणी ते पुणतांबा रेल्वे फाटकापर्यंत १२ गतिरोधक आहेत.

सुमारे वर्षभरापूर्वी परिसरातील ग्रामस्थ व वाहनचालकांनी सातत्याने तक्रारी केल्यानंतर गोंधवणी-श्रीरामपूरदरम्यान काही गतिरोधक काढण्यात आले. मात्र गोंधवणी ते पुणतांबा या मार्गावर अनेक ठिकाणी अनावश्यक गतिरोधक कायम असून, वाहनचालकांमध्ये मोठा संताप आहे. विशेषतः गोंधवणी येथे कृषी विभागाच्या कार्यालयासमोरच्या वळणावर, छोटी चारी, वन परिसराजवळ आणि खैरीनिमगावजवळील गतिरोधकांबाबत वाहनचालकांनी गंभीर तक्रारी केल्या आहेत. या गतिरोधकांवर पांढरे पट्टे नाहीत, तसेच ते लांबून दिसावेत यासाठी सूचनाफलक देखील नाहीत, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्याशिवाय या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने प्रवास आणखी त्रासदायक झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या श्रीरामपूर कार्यालयाबाबत वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या धोकादायक व अनावश्यक गतिरोधकांना तातडीने हटवावे, अशी मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून जोर धरत आहे.

# ग्रामपंचायतीत जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळाली पाहिजे या भावनेने संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द ग्रामपंचायतीत जागतिक दिव्यांग दिन (३ डिसेंबर) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील सर्व दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात दिव्यांग नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या, गरजा आणि अपेक्षा जाणून घेतल्या त्या अनुषंगाने तातडीने उपाययोजना करण्याला प्राधान्य दिले जाईल,असे ग्रामपंचायतीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी प्रवीण इल्हे यांनी शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांची माहिती देताना सरकारकडून उपलब्ध असलेल्या योजनांचे योग्य लाभ प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे असे सांगितले. ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या उत्पन्नातून गावातील ५० दिव्यांग नागरिकांना प्रत्येकी २,००० रुपये आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक झाले. लोकनियुक्त महिला सरपंच सौ. अलका बापूसाहेब गायकवाड यांनी आपल्या मनोगतात दिव्यांग बांधवांचे प्रश्न हे ग्रामपंचायतीच्या कार्ययोजनेचे केंद्रबिंदू आहेत.आगामी काळातही रोजगार,आरोग्य व मूलभूत सुविधांसाठी ठोस पावले उचलली जातील असे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला उपसरपंच बाबासाहेब भवर,सदस्य सोपान सोनवणे,संजय भोसले,सागर भडकवाड,कल्पना शिरसागर, जनाबाई शिंदे,सुवर्णा सातपुते, संगिता बर्डे,आशा मुंतोडे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

यावेळी विकास गायकवाड,संतोष भडकवाड, संजय गायकवाड,विशाल भवर,विष्णू दातीर,संजय साबळे, माया सोसे, सलीम शेख,संतोष साळवे, लहानू शिरतार, पंडित बालसाने, रमेश पाचारणे, कल्पना सातपुते, अरुण मुंतोडे यांच्यासह गावातील असंख्य दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष उजाळा दिला.

# ग्रामदैवत म्हसोबा महाराज यात्रा

## कुस्त्यांचा हंगामा, बैलगाडा शर्यत आणि लोकनाट्य तमाशा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर:** हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुकचे ग्रामदैवत म्हसोबा महाराज यात्रेला गुरुवार दि.४ डिसेंबर पासून आरंभ होत आहे.यात्रेनिमित्त ग्रामस्थ व यात्रा कमिटीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.



महाराष्ट्रासह अनेक राज्यातील हजारो भक्त असलेल्या म्हसोबा महाराज यात्रेला दत्त जयंतीला आरंभ होणार आहे.४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील व सौ.शालिनीताई यांच्या हस्ते मूर्ती अभिषेक होईल.दुपारी ४ वा.काठीची सवाद्य मिरवणूक निघेल.यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येईल.रात्री ९ वा. अश्विनी - शिवानी बोरगावकर यांचा मोफत लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.५ रोजी संगमनेर रस्त्यावरील लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील क्रीडा संकुल,रंगारी मैदान येथे दुपारी २ वा जंगी कुस्त्यांची दंगल होईल. रात्रौ ९ वा. मोफत सविताराणी पुणेकर लोकनाट्य तमाशाचे आयोजन केले आहे.शनिवार दि.६ रोजी दुपारी १ वा.लोणी - तळेगाव रस्त्यावरील सैनिकी स्कूल जवळ भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.राज्यातील अनेक जिल्ह्यातून स्पर्धक यात सहभागी होणार आहेत.

यात्रा कमिटी व ग्रामस्थांनी जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील,माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील,प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.राजेंद्र विखे पाटील,माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेचे भव्य नियोजन केले आहे.

# प्रामाणिक करदात्यांवर अन्याय थकबाकी दारांनाच सवलत ?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामपंचायत कर थकबाकीदारांसाठी जाहीर झालेल्या विशेष सवलत योजनेवर भाऊ प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष विकास साहेबराव गायकवाड यांनी अत्यंत झनझनित आणि निर्णायक तोफ डागली आहे. ही योजना प्रामाणिकपणे दरवर्षी कर भरणार्या सामान्य नागरिकांवर घोर अन्याय करणारी असून, मूळात राजकीय वजन वापरून कर थकवणाऱ्यांनाच लाभ देण्यासाठी बनवल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला आहे.



योजनेतील मोठा विसंवाद उघड: प्रामाणिक नागरिकांना 'शून्य लाभ'! ग्रामपंचायत कर थकबाकीदारांना ३१ डिसेंबरपर्यंत भरणा केल्यास मालमत्ता, दिवाबत्ती आणि पाणीपट्टी करात ५०% पर्यंत सवलत देणारी योजना सरकारने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'अंतर्गत आणली आहे. मात्र, आश्वी खुर्द येथील रहिवासी विकास गायकवाड यांनी या आकर्षक योजनेतील 'वास्तव आणि अन्याय' ठामपणे समोर आणले आहे:

प्रामाणिक नागरिक अडचणीत: गावातील शेतकरी, मजूर आणि दैनिक कामगार हे दाखले, बांधकाम परवानग्या आणि प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी दरवर्षी वेळेवर कर भरतात. कर न भरल्यास त्यांची कामे खोळंबतात, हा त्यांचा रोजचा अनुभव. थकबाकीदार मोकाट: याउलट मोठे जमीनदार, व्यापारी आणि राजकीय दबाव असलेले 'वजनदार' लोक अनेक वर्षांपासून कर बुडवतात. ग्रामसेवक त्यांच्याकडून कोणतीही कठोर वसुली करत नाहीत. अन्यायाचा कळस: आता शासनाच्या या सवलतीचा थेट फायदा याच वजनदार थकबाकीदारांना मिळणार आहे, तर नियमानुसार कर भरणार्या प्रामाणिक करदात्यांना मात्र 'शून्य सवलत, शून्य लाभ'! विकासभाऊंचा 'तोडगा' आणि 'अंतिम इशारा' ''हा कोणता न्याय? राजकीय दबावाखाली वसुली टळणाऱ्यांना सवलत, आणि प्रामाणिक जनतेला दंड? हा अन्याय स्वीकारणार नाही!'' असे खणखणीत मत विकासभाऊ गायकवाड यांनी व्यक्त केले आहे. त्यांची ठोस मागणी आहे की, प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांना १००% सवलत देण्यात यावी, अन्यथा ही योजना तात्काळ अन्यायकारक ठरवून रद्द करावी. या मागणीसाठी त्यांनी संगमनेर तहसीलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अ.नगर जिल्हा अधिकारी अहिल्या नगर यांच्यासह थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पालकमंत्री, महसूलमंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांच्यापर्यंत निवेदन पाठवून निर्णायक लढा सुरू केला आहे. सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी हा संघर्ष सुरूच राहील आणि गरज पडल्यास 'उपोषण' करण्याचा अंतिम इशारा देखील विकास गायकवाड यांनी दिला आहे. सामान्य करदात्यांच्या हक्कासाठी उभे ठाकलेले हे दुर्मिळ नेतृत्व शासनाला आता नमवते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उद्गारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# राहुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीचे मतदान ७२.४१ टक्के !

## किरकोळ अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगर परिषदेचे मतदान शांततेत पार पडले असुन सकाळ पासून मतदान केंद्रावर मतदानासाठी मतदारांनी रांगा लावल्याचे चित्र पाहावयास मिळाले पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व स्व आ. शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले व माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या उमेदवारांचे भवितव्य मत पेटीत बंद झाले असून आता मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याने सर्वांनाच निकालाची उत्सुकता लागलेली आहे.



काल सकाळ पासुनच राहुरी शहरातील मतदान केंद्रावर मतदानासाठी उस्फूर्तपणे मतदार येत असल्याचे चित्र निर्माण झाले होते सर्वच प्रभागात मतदान शांततेत पार पडले प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवारांच्या समर्थकांनी गर्दी केली होती मतदान केंद्रावर श्रीरामपूर विभागीय पोलिस उपअधीक्षक देवदत्त भवर राहुरी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आज तीन डिसेंबरला सर्वच नगरपरिषद पंचायतींचे निकाल होणार होते. परंतु नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार निकाल लांबल्याने उमेदवारांसह कार्यकर्ते निराश झाल्याचे चित्र दिसून येत होते.

राहुरी येथील मतदान केंद्रावर तनपुरे कुटुंबीयांनी मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावत असतानाच महाविकास आघाडीचाच विजय होणार असल्याचे संकेत दिले आहेत. या निवडणुकीत विखे पिता पुत्र व स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावून राहुरीतील भाजपाच्या उमेदवारांना पाठबळ दिले असल्याने भाजपा कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

आमचाच विजय होणार असल्याचे उमेदवारांसह कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत. एकंदरीत राहुरी नगर परिषदेची सत्ता काबीज करण्यासाठी विखे पिता पुत्रांसह अक्षय कर्डिले व माजी खा. प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावलेली आहे.

# द•ख•ल

## रंगोत्सव परीक्षेत बनसोडे इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी सुवर्णपदकाचे मानकरी



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील माका येथील गुणवत्ता,संस्कार व संस्कृती जपणारी शाळा म्हणून अल्पावधीत नावारूपास आलेल्या कै. तात्याबा बनसोडे इंग्लिश मिडीयम स्कूल माका येथील विद्यार्थ्यांनी रंगोत्सव सेलिब्रेशन मुलुंड मुंबई येथील संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत सुवर्णपदक मिळवत उत्तम कामगिरी केली आहे. अशी माहिती स्पर्धा परीक्षा प्रमुख मुलुंड मुंबई येथील संग्राम दाते यांनी दिली. सदर परीक्षेत एकाच शाळेचे, एकाच वेळी, एकाच परीक्षेत, एकाच वर्षी तब्बल ३४ विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले असल्याची ही तालुक्यातील पहिली स्कूल असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष सागर बनसोडे यांनी दिली. विद्यार्थ्यांनी हस्ताक्षर स्पर्धेत प्राविण्य मिळून सुवर्णपदक पटकावले.व शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

## मोरया चिंचोरे मध्ये कृषिकन्यांचे स्वागत

**सोनई** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्र मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनई महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक अंतर्गत मोरया चिंचोरे गावात दाखल झाल्या. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच प्रतिभा साहेबराव इलक, ग्रामविकास अधिकारी नितीन पवार, कृषिसेवक दहिफळे, अलका आल्हाट यांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. या मध्ये कृषीकन्या शरयु पवार, आदिती तागड, दिपाली शिंदे, भक्ती सोनवर, ऋतुजा वारे, भाविका वळवी यांचा समावेश होता. त्या शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे , उपप्राचार्य प्रा. सुनिल व्हि. बोरुडे , कार्यक्रम समन्वयक डॉ.अतुल दरंदले, डॉ. निर्मला विधाते,डॉ. एस.बी.चौगुले , प्रा. श्रीकृष्ण हुरुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

## रस्तापुर सोसायटीच्या अध्यक्षपदी शेख तर उपाध्यक्ष पदी अंबाडे



**नेवासा फाटा** : तालुक्यातील रस्तापुर विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी मेहबूब अब्दुल शेख तर उपाध्यक्षपदी सुमन राजेंद्र अंबाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. रस्तापूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधकारी योगेश नरसिंगपूरकर यांनी सभा बोलावली होती या सभेत ही निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक विठ्ठल भाकरे, सुरेश डाके, जनार्दन भाकरे, अरुण वैरागर, भारत भाकड, सुनील आढाव, मनिषा भाकड त्याचबरोबर दत्तात्रय उकिर्डे वसंतराव उकिर्डे, बापूसाहेब अंबाडे, अण्णासाहेब आंबाडे, गणेश अंबाडे आदी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून योगेश नरसिंगपूरकर यांनी काम पाहिले त्यांना संस्थेचे सचिव बी. बी. नजन एम. पी. शेख बी. एन. डांगे यांनी सहकार्य केले.

## देवगड नदीपात्रातील अपूर्ण पादचारी पुलाची आ. लंघे पाटील यांच्याकडून पहाणी

**नेवासा** : तालुक्याचे आ. विठ्ठल लंघे पाटील यांनी श्रीक्षेत्र देवगड येथील १३ गावांना जोडणाऱ्या प्रवरा नदी पात्रातील दहा वर्षापासून अपूर्ण असलेल्या पादचारी पुलाची स्वतः नदीपात्रातील होडीत बसून पाहणी केली. यावेळी त्यांनी परिसरातील येण्या जाण्यासाठी असुविधा असणाऱ्या विद्यार्थी व भक्तगण यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी देवगड परिसर भेटीप्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे आशीर्वाद घेऊन दर्जेदार पूल कसा करता येईल याबाबत चर्चा केली.यानंतर आ. लंघे पाटील यांनी ग्रामस्थ व भक्तमंडळांशी संवाद साधत अनेक दिवसांपासून बंद पडलेल्या पुलाचे काम आपले पालकमंत्री नामदार राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच निधी उपलब्ध करून कार्यान्वित केला जाईल अशी ग्वाही दिली अनेक दिवसापासून भक्तगण आणि विद्यार्थ्यांना भेडसावणारा हा पुलाचा प्रमुख प्रश्न लवकरच मार्गी लावणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या प्रसंगी देवगड(मुरमे)गावचे सरपंच अजय साबळे पाटील, अंकुश काळे,आ. लंघे पाटील यांचे स्वीय सहायक विजय पवार यांच्यासह परिसरातील शालेय विद्यार्थी व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी पूर्ण करणार असल्याची ग्वाही दिली असल्याने पंचक्रोशीतील तेरा गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून सदर पुलामुळे १३ गावातील लोक हे जोडले जाणार असल्याने ग्रामस्थांसह भाविक भक्तांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## कर्ममार्गाचा महामंत्र' ज्ञानगंगा विद्यानिकेतनमध्ये 'गीता जयंती' उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वि** : जगातील एकमेव ग्रंथ ज्याची जयंती मोठ्या भक्तीभावाने साजरी केली जाते, त्या 'श्रीमद् भगवद्गीतेची' जयंती (गीता जयंती) नुकतीच संगमनेर तालुक्यातील शैक्षणिक संकुलातील ज्ञानगंगा विद्यानिकेतन येथील आनंदसागर अध्यात्मिक केंद्रामध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सोहळ्याला इयत्ता नववीचे सर्व विद्यार्थी आणि वर्गशिक्षिका शुभांगी गाडेकर या उपस्थित होत्या.

या प्रसंगाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी अत्यंत एकाग्रतेने श्रीमद् भगवद्गीतेतील अध्याय बारावा (भक्तियोग) आणि अध्याय पंधरावा (पुरुषोत्तमयोग) यांचे सामूहिक पाठांतर केले. विद्यार्थ्यांच्या मुखातून निघालेल्या या श्लोकपठणामुळे केंद्राचे संपूर्ण वातावरण अध्यात्ममय झाले होते. पाठांतरानंतर संस्कृत अध्यापक प्रदीप जगताप यांनी उपस्थितांना



श्रीमद् भगवद्गीतेच्या निर्मितीमागील दैवी आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी सविस्तरपणे समजावून सांगितली. प्रा. जगताप म्हणाले, भगवंतांनी जगाच्या कल्याणासाठी दिलेला उपदेश म्हणजेच भगवद्गीता होय. हा ग्रंथ केवळ मोक्षाचा मार्ग नव्हे, तर कर्तव्यपरायणतेचा आणि कर्ममार्गावर निष्ठा ठेवण्याचा अमूल्य संदेश देतो. मोहाच्या पाशात अडकलेला श्रेष्ठ धनुर्धारी अर्जुन जेव्हा आपले कर्तव्य विसरून धनुष्य खाली ठेवतो आणि युद्धास नकार देतो, तेव्हा भगवान श्रीकृष्ण त्याला निमित्त करून संपूर्ण विश्वाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव आणि कर्मयोगाचे महान तत्त्वज्ञान भगवद्गीतेच्या माध्यमातून देतात. त्यामुळे, ही 'भगवद्गीता' म्हणजे केवळ धर्मग्रंथ नसून, मानवाला जीवनातील प्रत्येक संघर्षात योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करणारा, जगाच्या पाठीवरील एक अद्वितीय तत्त्वज्ञान ग्रंथ आहे. असे सांगितले. दरम्यान ज्ञानगंगेतील विद्यार्थ्यांनी गीता जयंतीच्या निमित्ताने कर्म आणि धर्म म्हणजे कर्तव्याचे महत्व आत्मसात केले आणि आध्यात्मिक जाणिव अधिक मजबूत केल्यानंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या सर्व कार्यक्रमासाठी संस्थाप्रमुख शाळीग्राम होडगर, प्राचार्य विजय पिसे व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

## श्रीराम साधना आश्रमात ब्रम्हलिन प्रकाशगिरी बाबांचा पुण्यतिथी सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत सुनीलगिरी महाराज यांचे गुरुवर्य हरिद्वार येथील ब्रम्हलिन महंत स्वामी श्री प्रकाशगिरीजी बाबा यांचा ४ था पुण्यतिथी सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमाने भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या सोहळयात संत महंतांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून महंत श्री प्रकाशगिरी महाराजांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. हरिद्वार येथील महंत श्री ओंकारजी महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गीता जयंतीचे औचित्य साधून झालेल्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत श्री सुनिलगिरीजी महाराज,साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य,वारकरी भूषण हभप श्री चंद्रभान महाराज म्हसलेकर यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात स्वामी प्रकाशगिरी बाबांच्या पादुकांसह प्रतिमेचे पूजन पुष्पांजली अर्पण करून करण्यात आले.



यावेळी बोलतांना श्रीराम साधना आश्रमाचे महंत श्री सुनीलगिरीजी महाराज म्हणाले की हरिद्वार येथील आमचे गुरुवर्य ब्रम्हलीन महंत श्री प्रकाशगिरीजी बाबा यांनी पंचायती निरंजन आखाडयाच्या माध्यमातून धर्म कार्याला दिशा देणारे अनेक शिष्य घडवले,त्यांनी आम्हाला दिलेली धर्म कार्याची शिदोरी बरोबर घेऊन समाज उद्धारासाठी शेवटच्या श्वासापर्यंत धर्मकार्य करत राहू असा निर्धार महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. यावेळी साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य यांनी ब्रम्हलिन संत सदगुरू प्रकाशगिरी बाबांचे जीवनकार्य यावेळी उपस्थित भाविकांसमोर बोलतांना विषद केले. तसेच उपस्थित संत महंतांनी ब्रम्हलीन सद्गुरू प्रकाशगिरी बाबांचे जीवनकार्य विषद करून त्यांनी केलेल्या कार्याला उजाळा देऊन त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

या प्रसंगी वारकरी भूषण चंद्रभान महाराज म्हसलेकर यांचे अगाध महिमा असलेल्या संत अवतारावर हरि किर्तन झाले. उपस्थित भाविकांना यावेळी श्रीराम साधना आश्रमाच्या श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने उपस्थित हजारो भाविकांना महाफराळाचे वाटप करण्यात आले.

## कृषि विद्यापीठात काम करण्याचा सार्थ अभिमान : कुलगुरु डॉ. खर्चे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : बदलत्या हवामानाचा शेतीवर गंभीर परिणाम होत असून जमिनीचे आरोग्य खालावत चालले आहे. पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीसोबतच शाश्वत शेतीवरील संशोधनाची वेळ आल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

या जागतिक कीर्तीच्या विद्यापीठात काम करणे हा माझ्यासाठी सार्थ अभिमान आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. महात्मा फुले कृषि विद्यापीठात कुलगुरुपदाचा पदभार स्विकारल्यानंतर आयोजित सत्कार समारंभात ते बोलत



होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला तसेच राहुरी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. शरद गडाख होते.

या वेळी व्यासपीठावर मंदाकिनी गडाख, सुरुची खर्चे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता इंजी. मिलिंद ढोके, प्रभारी कुलसचिव विजय पाटील, डॉ. प्रकाश कडू, डॉ. कौस्तुभ खर्चे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. खर्चे पुढे म्हणाले की, विद्यापीठाने संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून त्याची उंची कायम ठेवण्यासाठी सर्वांनी समर्पणभावाने काम करण्याची गरज आहे. ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रिमोट सेंसिंग यांच्या मदतीने पिकांची उत्पादनक्षमता वाढवण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरुपदी निवड केल्याबद्दल त्यांनी राज्यपालांचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गडाख म्हणाले की, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने आतापर्यंत शेतकरी हितासाठी ३२१ पेक्षा जास्त वाण, ५५ यंत्रे आणि २००० हून अधिक तंत्रज्ञान शिफारसी दिल्या आहेत. सध्या विद्यापीठातील ६५ टक्के जागा रिक्त असून निधीअभावी अडचणी निर्माण झाल्या आहेत. विद्यापीठ आत्मनिर्भर करण्यासाठी बिजोत्पादनप्रमाणे विविध कृषि-निविष्ठांचे उत्पादन वाढवावे आणि शासनाकडून नवी प्रकल्प मंजूर करून घ्यावेत, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. डॉ. सातापा खरबडे, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. प्रशांत बोडके, डॉ. प्रकाश कडू, इंजी. मिलिंद ढोके, डॉ. नितीन दानवले व डॉ. महाविरसिंग चौहान यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला विविध कृषि विद्यापीठांचे अधिकारी, निवृत्त शास्त्रज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी केले तर आभार विजय पाटील यांनी मानले.

## मोक्षदा एकादशीनिमित्त भक्तीचा महासागर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संत कवी महिपती महाराज आणि संत मुकुंददास महाराज यांच्या पवित्र चरणस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र दाढ खुर्द येथे सध्या भक्तिरसाचा महासागर उसळला आहे. ब्रह्मलीन सद्गुरु माणिकगिरी महाराज - बिरोबा महाराज यांच्या स्मरणार्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत ह.भ.प. महंत गुरुवर्य दत्तगिरी महाराज (वरवंडी-उंबरेश्वर) यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात सुरू आहे.

पंचक्रोशीतील भाविकांच्या सहकार्याने हा सप्ताह अत्यंत भव्य आणि भक्तिरूपाने सुरू असून सोमवार, १ डिसेंबर, मोक्षदा एकादशी व गीता जयंतीचा दिवस विशेष ठरला. दिवसभर साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद सुरू होता. दुपारी तीन वाजता काढण्यात आलेली भव्य शोभायात्रा पाहण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती. दाढ फाटा-येमाई मंदिरमार्गे गावठाणापर्यंत सुमारे तीन तास चाललेली ही मिरवणूक नजरेत भरावी अशी झाली. महिला भक्तांनी डोक्यावर कलश धारण करून मिरवणुकीत अग्रभागी स्थान घेतले होते. त्यांच्या मागोमाग भजनी मंडळे, डफ, संबळ, ताशा-ढोल आणि संगीत पथकांच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

मार्गभर काढलेल्या रांगोळ्यांनी आणि घरासमोर उभारलेल्या गुढ्यांनी वातावरण अधिक मंगल झाले होते. महंत दत्तगिरी महाराज अश्वरथात विराजमान होताच भाविकांनी जयघोष करत स्वागत केले. या दिव्य सोहळ्याने भाविकांना जणू स्वर्गीय दर्शनाचा अनुभव दिला. रात्रीच्या सत्रात रामायणाचार्य ह.भ.प. डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री यांनी कीर्तनातून उपस्थितांना अध्यात्मिक उंचीवर नेले. संत तुकाराम महाराजांच्या 'करा क्षमा अपराध' या अभंगाचे चिंतन करत त्यांनी संतांच्या करुणाभावाचा सुंदर वेध घेतला. गीता जयंती निमित्त बोलताना त्यांनी परदेशात गीता कोर्स, पण भारतात गीता कोर्ट! असा उपरोधिक पण परिणामकारक संदेश दिला. सप्ताहाची दिव्यता ही ब्रह्मलीन माणिकगिरी महाराजांच्या कृपेनेच असल्याचे त्यांनी सांगितले तर महंत दत्तगिरी महाराजांच्या त्याग आणि तपश्चर्येचे विशेष कौतुक केले. दाढ खुर्दचा सप्ताह भूतो न भविष्यति असा असल्याचे त्यांनी नमूद केले. कीर्तनानंतर पंचक्रोशीतील पंगत देणाऱ्या गावांच्या सहकार्याने २० क्विंटल साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद शिस्तबद्धपणे देण्यात आला. महंत दत्तगिरी महाराज यांच्या नेतृत्वाखाली सप्ताहाचे आयोजन उत्कृष्ट, नियोजनबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडत असल्याबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे.

## महंत रामगिरी महाराजांच्या कीर्तनाने सप्ताहाचा समारोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि किर्तन महोत्सवाचे आयोजन २५ नोव्हेंबरपासून शिवमारुती देऊळ उंदीरगाव आऊंट साईट, हरेगाव बस स्टँड समोर करण्यात आले होते. मंगळवारी, २ डिसेंबर रोजी महोत्सवाचा समारोप श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेट महंत रामगिरी महाराज यांच्या मधुर वाणीच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिभावाने पार पडला. समारोपादरम्यान हरेगाव चर्चगेटपासून शिवमारुती देऊळपर्यंत रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

आयोजकांनी पुष्पहार देऊन महंत रामगिरी महाराजांचे भव्य स्वागत केले. डीजेच्या आवाजात महिला-पुरुष भाविकांनी आनंदोत्सव साजरा केला. सप्ताहभर सकाळी पहाटे काकडा व सकाळी सात वाजता ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी चार वाजता हरिपाठ आणि रात्री सात ते नऊ वाजता हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. माऊली महाराज गुंजाळ हे व्यासपीठ चालक होते. महंत रामगिरी महाराजांच्या काल्याच्या कीर्तनासह महाप्रसाद दिला गेला आणि भक्तीमय वातावरणात महोत्सवाचा समारोप झाला.

## आमदार तांबे परिवारासह मतदानास हजर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेरमध्ये काल दि. २ डिसेंबर आमदार सत्यजित तांबे व डॉ. मैथिलीताई तांबे यांनी आपल्या परिवारासह लोकशाहीचा उत्सव साजरा करत मतदानाचा हक्क बजावला.

मतदानानंतर ते माध्यमांशी बोलत असताना, काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर टीका केली. थोरात म्हणाले की, मतदान प्रक्रिया निर्दोष असणे अत्यंत महत्त्वाचे असूनही आयोगाचा कार्यक्रम नीट आखला जात नाही.

निवडणूक आयोग हा सत्तेचा गुलाम झाला आहे. मंत्रालयातील कुणीतरी पीए कार्यक्रम ठरवतो आणि आयोग त्याची अंमलबजावणी करतो,



असा आरोप त्यांनी केला. मतदार याद्यांतील गोंधळ, राजकीय हस्तक्षेप तसेच ईव्हीएम संदर्भातील शंका यांचा त्यांनी समाचार घेतला.

ईव्हीएम २० दिवस ठेवण्यापेक्षा मतदानानंतर दुसऱ्याच दिवशी मतमोजणी व्हावी, अशी मागणी थोरात यांनी केली. आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले की, बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका आणि शहरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत.

जनतेचा विश्वास आमच्यावर आहे. सेवा समितीचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या, विरोधक केवळ आरोप करतात; आमचे काम म्हणजे सातत्याने काम करत राहणे. काम केले आहे, त्यामुळे यंदाही कमाल करू. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. हर्षल तांबे, डॉ. वर्षाताई तांबे यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

## खेळातून सांघिक भावना वाढते : शालीनीताई विखे

### अध्यक्षा मॅडम चषक शंभूराजे इलेव्हन गोगलगाव संघाने पटकावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : शिक्षणाबरोबरच खेळायलाही अनन्य साधारण महत्त्व आहे . खेळाच्या माध्यमातून सांघिक भावना आणि आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना वाढीस लागते क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून सर्वांना एकत्र आणण्याचे काम बाभळेश्वरच्या युवकांनी केले आहे आज प्रवरेची कन्या पुनम खेमनर हिची मुंबई इंडियन्स मध्ये झालेले निवड हा खऱ्या अर्थाने प्रवरेचा अभिमान असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

बाभळेश्वर येथे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधन स्पीड इलेव्हन, डॉ. सुजय विखे पाटील आणि बबलू म्हस्के मित्र मंडळाने आयोजित अध्यक्षा मॅडम चषक २०२५ च्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात सौ विखे पाटील बोलत होत्या. यावेळी



ट्रक वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव,संदिप देशमुख, महेश वाघे, शरद आहेर, पप्पू गाढवे,सचिन शिंदे, शंकर बेंद्रे, अण्णासाहेब बेंद्रे, नितीन विखे, अजित बेंद्रे, बबलू म्हस्के, संदीप डहाळे, सतीश मोरे, अमोल डुबे, शुभम म्हस्के, किरण खोबरे, रामप्रसाद मगर अंकुश शेकडे आदींसह परिसरातील क्रिकेट प्रेमी उपस्थित उपस्थित होते. या पारितोषिक वितरण समारंभामध्ये जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतनही करण्यात आले.

अंतिम सामना शंभूराजे इलेव्हन गोगलगाव आणि विजय डे फार्म लोणी यांच्यात होऊन यामध्ये शंभूराजे इलेव्हन यांनी एक लाखाचे पारितोषिक मिळवत अजिंक्यपद तर विजय डे फार्म लोणी यांनी उपविजेतपद मिळवले याशिवाय वैयक्तिक बक्षिसे अक्षय ज-हाड, असिफ शेख, सुहास घुले, किरण घुले यांना प्रदान करण्यात आला. स्पर्धेचे समालोचन शाहरुख पठाण आणि मनोज बेल्हेकर यांनी केले.

## पान १ वरुन

### मतदान संपले, तणाव कायम

असल्यामुळे २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडणुकीसाठी मतदान नंतरच्या तारखेला, म्हणजेच २० डिसेंबरला होणार आहे. त्यामुळे राज्यातील एकूण मतदान प्रक्रियेत थोडासा फरक आहे. आज होणाऱ्या मतदानाच्या निकालाची मोजणी ३ डिसेंबरला होणार होती, मात्र आता संपूर्ण मतमोजणी २१ डिसेंबरला होईल. मंगळवारी एकूण २६४ अध्यक्षपदांच्या आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी आज मतदान पार पडले. अनेक ठिकाणी वाद, हाणामारी आणि नियमांचे उल्लंघन झाले असले तरी, मतदारांनी आपला हक्क उत्साहाने बजावला आहे.

### नगरमध्ये तीन मजली इमारतीला भीषण आग

अग्निशमन वाहनांना (बंबांना) पाचारण केले.

दरम्यान, महानगरपालिकेच्या बचाव पथकाने (रेस्यू पथक) तातडीने शेजारील सात ते आठ घरे रिकामी केली. अखेरीस, मनपा आणि सैन्य दलाच्या २० ते २२ अग्निशमन वाहनांनी अथक प्रयत्नानंतर या भीषण आगीवर नियंत्रण मिळवले. मनपा आयुक्तांनीही घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा आढावा घेतला. या दुर्घटनेत लाखोंचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### आठ पालिकांच्या कारभाऱ्यांचे भवितव्य मतदानयंत्रात बंदिस्त!

मतदान नोंदवले गेले. सायंकाळी साडेपाच नंतरही अनेक मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. महिलांचा सहभाग चांगला राहिला असून, जामखेड नगरपरिषदेत सर्वाधिक उत्साह दिसून आला.मतदानादरम्यान कुठेही गंभीर प्रकार घडले नाहीत. मात्र, शिर्डीमध्ये कमी टक्केवारीमुळे राजकीय नेत्यांमध्ये चर्चा रंगली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, मतदारांनी शांततेने सहभाग घेतला. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रणेची चाचणी यशस्वी झाली. शेवगाव, शिर्डी, राहुरी, राहाता, श्रीगोंदा पालिका निवडणुकांमध्ये स्थानिक मुद्दे व अपक्षांचा प्रभाव दिसून आला. महायुती (भाजप-शिवसेना-अजित गट) व महाविकास आघाडी (काँग्रेस-शरद पवार गट-ठाकरे सेना) यांच्यातील युती फुटल्याने बहुकोरी लढती रंगल्या. एकूण २१४ नगराध्यक्ष व २,२७२ सदस्य उमेदवारांसाठी नामांकन दाखल झाले होते, ज्यातून वैध अर्जांची संख्या कमी झाली.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबरला कार्यक्रम जाहीर केला असून, जिल्ह्यात एकूण ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. मात्र, न्यायालयीन अपीलांमुळे चार पालिकांच्या निवडणुका २० डिसेंबरला होणार आहेत. या निवडणुकीत स्थानिक विकास, पाणीटंचाई व रस्ते यांसारखे मुद्दे प्रमुख राहिले. निकालानंतर जिल्ह्यातील सत्तासंघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. मतदारांनी लोकशाहीचा उत्सव साजरा केला असून, निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### बिहाणी-ससाणे समर्थक भिडले

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीला पूर्णविराम देत श्रीरामपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासह ३३ जागांसाठी आज मतदान पार पडले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजप-राष्ट्रवादीचे श्रीनिवास बिहाणी यांना नगराध्यक्षपदासाठी उतरवले, तर काँग्रेसकडून करण ससाणे, शिंदे सेनेचे प्रकाश चित्ते, ठाकरे सेनेचे अशोक थोरे यांच्यासह एकूण नऊ उमेदवार रिंगणात होते. १४२ नगरसेवक उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला ईव्हीएममध्ये बंद झाला. प्रभाग ३ (अ) ची निवडणूक २० डिसेंबरला होणार आहे. मोरगे वस्ती मतदान केंद्रावर करण ससाणे व श्रीनिवास बिहाणी समर्थकांमध्ये जोरदार बाचाबाची झाली; पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.

### भरत गोगावलेंच्या मुलावर रिव्हॉल्व्हर रोखली

समर्थकांच्या गाड्यांच्या काचा फोडल्या आहेत. ही बाचाबाची सुरु असताना सुशांत जाबरे यांच्या समर्थकांनी विकास गोगावले यांना रिव्हॉल्व्हर दाखवल्याची माहिती आहे. त्यामुळे हा वाद चिघळला. विकास गोगावले हे रिव्हॉल्व्हर घेऊन पोलीस ठाण्यात पोहोचल्याची माहिती आहे. याप्रकरणात आता पोलीस काय कारवाई करणार, हे बघावे लागेल.राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून पालकमंत्रीपदावरुन भरत गोगावले आणि सुनील तटकरे यांच्यात सातत्याने वाद सुरु आहेत. याच वादातून दोन्ही नेते एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात असतात. गेल्या काही काळामध्ये तटकरे आणि गोगावले या दोघांनीही एकमेकांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी फोडले आहेत. त्यामुळे सुनील तटकरे आणि भरत गोगावले यांच्यातील वैर आणखीनच वाढले आहे. याचा उद्रेक मंगळवारी मतदानावेळी पाहायला मिळाला. या वादानंतर सुनील तटकरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. निवडणुकीमध्ये शांतता राखणे आपले कर्तव्य ठरते. सकाळपासून युवा नेते म्हणवारे मतदान केंद्रात जात आहेत, आरओशी हुज्जत घालतात. मतदान केंद्रात जाण्याचा अधिकार अधिकृत उमेदवार आणि प्रतिनिधीला असतो. मात्र, विकास गोगावले मतदान केंद्रांमध्ये आत जात आहेत, असे सुनील तटकरे यांनी म्हटले.

# पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलले; पीएमओ नव्हे 'सेवा तीर्थ' तर राजभवन बदलून 'लोक भवन'



**नवी दिल्ली** : पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलण्यात आले आहे. ते आता 'सेवा तीर्थ' म्हणून ओळखले जाईल. याचबरोबर देशभरातील राजभवनांची नावे देखील बदलण्यात आली आहेत.

आता त्यांना 'लोक भवन' म्हणून ओळखले जाईल. पंतप्रधान कार्यालयाने सांगितले की, भारताच्या सार्वजनिक संस्थांमध्ये एक मोठा बदल होत आहे. प्रशासनाची कल्पना सत्तेकडून सेवेकडे आणि अधिकाराकडून जबाबदारीकडे जात आहे. हे बदल केवळ प्रशासकीय नाही तर सांस्कृतिक नैतिक देखील आहेत. पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) आता त्याच्या ७८ वर्षे जुन्या साउथ ब्लॉकमधून निघून सेवा तीर्थ नावाच्या नवीन प्रगत कॅम्पसमध्ये जात आहे. हा बदल सेंट्रल व्हिस्टा पुनर्विकास प्रकल्पाचा एक प्रमुख भाग आहे. यापूर्वी, केंद्र सरकारने राजपथचे नाव बदलून कर्तव्य पथ असे ठेवले होते. पंतप्रधान कार्यालयाच्या मते, हा मार्ग आता एक संदेश देतो पॉवर हा अधिकार नाही, तर एक कर्तव्य आहे.

# कराडजवळ विद्यार्थ्यांची बस २० फूट खड्ड्यात कोसळली, ४५ जण जखमी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाशिक** : कराड जवळ नाशिकच्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांची बस २० फुट खड्ड्यात कोसळली आहे. या बसमध्ये ४० ते ४५ विद्यार्थी प्रवास करत होते, या घटनेमध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुणे-बंगळुर महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. यामुळे सातारा ते कराड दरम्यान अनेक ठिकाणी रस्त्यात वळणे आहेत. अनेक ठिकाणी बॅरिकेड्स आहेत. रस्त्याच्या बाजूने खुदाईचे काम सुरू आहे. यामुळे दररोज अपघात होत आहेत.

चालकाचा ताबा सुटून सहलीची बस उड्डाणपुलाचे काम सुरू असलेल्या खड्ड्यात पडून झालेल्या भीषण अपघातात चालकासह ५० विद्यार्थी, २ शिक्षक व ४ आचारी असे ५७ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी एका विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे. पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वाठार ता कराड गावच्या हद्दीत मंगळवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर अपघात स्थळी एकच कल्लोळ उडाला होता.

अपघात स्थळावरून व पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक येथील पी बी पाटील महाविद्यालयाची बस (क्रमांक एम एच ०४ जे पी ०९२० मधून ५० विद्यार्थ्यांसह २ शिक्षक व ४ आचारी असे ५७ जण नाशिक वरून मालवणला सहलीसाठी गेले होते. सहल आटपून परत नाशिकला परत जात असताना पुणे बेंगलोर महामार्गावर वाठार तालुका कराड गावच्या हद्दीत आले असता सुरक्षिततेचा उपाय नसल्यामुळे चालकाचा ताबा सुटून बस उड्डाण पुलावरून काम सुरू असलेल्या खोल खड्ड्यात कोसळली. या अपघातात चालकासह ५० विद्यार्थी, २ शिक्षक व ४ आचारी असे ५७ जण जखमी झाले आहेत.जखमींपैकी एका विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे. अपघात होताच अपघात स्थळी एकच गोंधळ उडाला होता. वाठार ता कराड गावच्या ग्रामस्थांनी अपघात स्थळी धाव घेतली. अपघाताची माहिती पोलिसासह महामार्ग पोलीस व देखभाल विभागाला दिली. अपघाताची माहिती मिळताच कराड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, प्रशांत जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी तातडीने अपघात स्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने अपघातग्रस्त विद्यार्थ्यांना येथील कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० जणांना रुग्णालयात भरती करून घेण्यात आले. तर उर्वरित विद्यार्थ्यांवर प्राथमिक उपचार करण्यात आले.

अपघाताची नोंद घेण्याचे काम कराड तालुका पोलिसांच्या वतीने सुरू आहे. आमदारांकडून अपघातगृहस्थ विद्यार्थ्यांची विचारपूस सहलीतील अपघातग्रस्त विद्यार्थ्यांवर कृष्णा हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. आमदार डॉ. अतुल भोसले यांनी हॉस्पिटलमध्ये तात्काळ जाऊन जखमी विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांच्या प्रकृत्तीची विचारपूस केली तसेच डॉक्टरांशी चर्चा करून उपचारांबाबत सर्व आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

# ब्रम्हलिन महंत श्री बालब्रम्हचारी महाराज मंदिरावर वेदमंत्राच्या जयघोषात कलशारोहन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील टोका येथील श्री सिध्देश्वर महादेव मंदिराचे प्रमुख महंत ब्रम्हलिन १००८ श्री बालब्रम्हचारीजी महाराज यांच्या नव्याने बांधण्यात आलेल्या समाधी मंदिरावर देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरी महाराजांच्या हस्ते व संत महंतांच्या उपस्थितीत वेदमंत्राच्या जयघोषात कलशारोहन करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बालब्रह्मचारी महाराज यांच्या समाधीचे पूजन स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज,नेवासा येथील मध्यमेश्वर मंदिर देवस्थानचे महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज,गंगापूर तालुक्यातील रामगड संस्थानचे मंहत हभप बाळकृष्ण महाराज दिघे, हभप योगीराज दादा महाराज वायसळ,जम्मू काश्मीर येथील भाजपचे प्रदेशाध्यक्ष नंदकिशोरजी शर्मा,पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख उद्योजक प्रभाकरराव शिंदे, पंचगंगाचे संचालक व सेवेकरी बाळासाहेब शिंदे,भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीनभाऊ दिनकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वेदमंत्राच्या जयघोषात व संत मंडळींच्या उपस्थितीत ब्रम्हलिन श्री बालब्रम्हचारी महाराज यांच्या समाधी मंदिरावर कलशारोहन करण्यात आले.या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमाचे पौरोहित्य गंगापूर येथील वेदशास्त्रसंपन्न आचार्य सोनूगुरू देवळे,किरणगुरू देवळे,नितीन धुमाळ यांनी केले.

यावेळी बोलतांना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी बालब्रम्हचारी महाराज यांच्या धर्म कार्याचे कौतुक केले.अनेक जीवांचा उद्धार करतांना त्यांनी अनेकांना सन्मार्गाला लावून नवसंजीवनी त्यांच्या जीवनात प्राप्त करून दिली.दुर्लक्षित असलेले सिद्धेश्वर देवस्थान त्यांनी उदयास आणले त्यांचे कार्य हे भक्तांना नेहमीच ऊर्जा देत राहील असे सांगून कलशारोहन सोहळयाला शुभाशीर्वाद दिले.

या प्रसंगी उपस्थित संत महंतांचे संतपूजन बाळासाहेब शिंदे,प्रभाकरराव शिंदे,नितीन दिनकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी योगीराज दादाजी महाराज वायसळ यांचे गुरुभक्ती व गुरुसेवा या विषयांवर मंत्रमुग्ध करणारे किर्तन झाले.

या कार्यक्रम प्रसंगी टोका गावचे माजी उपसरपंच वसंतराव डावखर,सेवेकरी रमेश गंगुले,दिपक पिंगळे, शांतवन खंडागळे,कैलास खंडागळे,शिवाजीराव मते,रविंद्र सरोदे,बंटी शेजुळ,दत्तू डावखर, किशोर जोशी यांच्यासह अहिल्यानगर,नाशिक,छत्रपती संभाजीनर जिल्हयातील परमपुज्यनिय ब्रम्हलिन श्री बालब्रम्हचारी महाराज यांचा शिष्य वर्ग, पंचक्रोशीतील भाविक भक्त व भक्त परीवारातील सेवेकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैजापुरात मतदारांच्या रांगा दुपारपर्यंत ७६ टक्के मतदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**वैजापूर** : वैजापूर नगर परिषदेच्या बारा प्रभागातील २३ जागा व नगरध्यक्षपदासाठी आज, मंगळवारी (२ डिसेंबर ) झालेल्या मतदान प्रक्रियेत सकाळी साडे सात ते साडे तीन वाजेपर्यंत अकरा हजार ३०२ पुरुष व अकरा हजार ७३८ स्त्री अशा सुमारे २३ हजार ४० मतदारांनी म्हणजेच ५४. ४२ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. अनेक मतदान केंद्रावर रात्री सात वाजेनंतरही मतदान सुरु होते. शेवटच्या दोन तासात झालेल्या मतदानाची आकडेवारी लगेच प्राप्त होऊ शकली नाही. मात्र, साधारणपणे ६५ ते ७० टक्के मतदान होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. किरकोळ प्रकार वगळता मतदाना दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

वैजापूर शहरात मतदान प्रक्रियेसाठी ४८ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी साडे सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. मात्र सुरुवातीचे दोन तास वगळता दिवसभर मतद्मांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. त्यामुळे बहुतेक सर्वच मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा बघायला मिळाल्या. बाजार समिती येथील मतदान केंद्र, दर्गा बेस, मौलाना आझाद शाळा, लोकमान्य टिळक शाळा आदींसह अनेक मतदान केंद्र गर्दीने फुलले होते. निवडणूक विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, सकाळी साडे सात ते साडे अकरा या वेळेत २०. ३५ टक्के, दिड वाजेपर्यंत ३६. ८६ टक्के व साडे तीन वाजेपर्यंत ५४. ४२ टक्के मतदानाची नोंद झाली. अनेक केंद्रावर अतिशय संथ गतीने मतदान प्रक्रिया सुरु राहिल्याने जेष्ठ नागरिक, महिलांचे हाल झाले. मतदान संपेपर्यंत ६५ टक्के मतदान होण्याची शक्यता आहे.

भाजपाचे नगरध्यक्षपदाचे उमेदवार डॉ दिनेश परदेशीं, माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी यांनी शहरातील एका केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. शिवसेनेचे उमेदवार संजय बोरनारे यांनी मौलाना आझाद प्राथमिक शाळा येथे मतदान केले. आमदार रमेश बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर आदींसह अनेक नेते मंडळी मतदानावर लक्ष ठेवून होती. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भागवत बिघोत व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया अतिशय शांततेत राबवण्यात आली.

प्रभाग क्रमांक सहा व दोन काही तांत्रिक अडचणीमुळे देवी मशीन काही कारणास्तव खराब झाल्याचे दिसून आले होते प्रशासनाने लवकर सुरळीत चालू केले

दरम्यान, वैजापुरात २१ हजार ३४३ पुरुष व २० हजार ९९१ महिला असे ४२ हजार ३३४ मतदार आहेत. नगराध्यक्षा पदासाठी निवडणूक लढवणाऱ्या तीन व नगरसेवक पदासाठी ७३ अशा ७६ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले.

### वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

अहिल्यानगर : अहिल्यानगर-दौंड महामार्गावर अरणगाव (ता. नगर) शिवारात हॉटेल समाधानजवळ झालेल्या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. या प्रकरणी अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाविरुद्ध ३० नोव्हेंबर रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीराबाई भानुदास शिंदे (रा. डिग्रस, ता. राहुरी) असे मृत महिलेचे नाव आहे. राजेश भानुदास शिंदे (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे. राजेश शिंदे यांच्या फिर्यादीनुसार त्यांची आई रस्त्यावरून पायी जात असताना वाहनचालकाने वाहन हयगयीने आणि रस्त्याकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवले. या भरधाव वाहनाची जोरदार धडकेमुळे त्या गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. महिला पोलिस अंमलदार मनीषा काळे पुढील तपास करीत आहेत.

## निधन वार्ता..

### डॉ.निवृत्ती वाकचौरे



**श्रीरामपूर** : कोपरगाव सुभद्रानगर येथील डॉ निवृत्ती त्र्यंबक वाकचौरे (वय ८२) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले यांचे मागे एक मुलगा तीन मुली,नातवंडे असा परिवार आहे.५० वर्षे पोहेगाव येथे डॉक्टर सेवा दिली.नितीन यांचे ते वडील होत.

### स्वरुपचंद कोठारी



**श्रीरामपूर** : येथील जैन समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक व जैन संघाचे माजी सेक्रेटरी, खा. गोविंदराव आदिक शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्ष तसेच मेनरोड वरील अतुल ट्रेडींग कंपनीचे मालक स्वरुपचंद अमलोकचंदजी कोठारी यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी अल्पश: आजाराने उपचार सुरु असतांना हॉस्पीटलमध्ये निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, पणतु, पुतणे, चुलत बंधु असा परिवार आहे. मरणोत्तर त्यांचे नेत्रदान व देहदान करण्यात आले.

कोठारी हे अतुल ट्रेडींगचे संचालक अनिल व अतुल कोठारी यांचे वडील तर नितेश व आकाश कोठारी यांचे आजोबा होत.

# पंचगंगा शुगर अँड पॉवर, ऊसाचे वेळेवर पेमेंट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : पंचगंगा शुगर अँड पॉवर प्रा.लि. महालगाव येथील ऊस बागायतदारांना दिलेला आश्वासक शब्द पाळत कारखान्याकडून पहिल्या पंधरवड्याचे ऊस पेमेंट वेळेवर करण्यात आले आहे. १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गळीतास आलेल्या सर्व ऊसाचा मोबदला दि. १ डिसेंबर २०२५ रोजी थेट बागायतदारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे.

या कालावधीत २६५ ऊस जातीस प्रति मे.टन ३,०५० रुपये तर इतर जातींसाठी ३,१५० रुपये इतका दर निश्चित करण्यात आला होता. ठरलेल्या दरानुसार कोणतीही कपात न करता संपूर्ण रक्कम बिनचूक खात्यात जमा झाल्याने बागायतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

यंदाच्या हंगामात कारखान्याने 'पारदर्शक वजन काटा व पंधरा दिवसांत पेमेंट' ही प्रमुख तत्वे केंद्रस्थानी ठेवून कारभार सुरु केल्याने बागायतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. वास्तविक वजनाप्रमाणे ऊसाचा हिशेब होत असल्याने कोणत्याही शंका-कुशंका राहिलेल्या नाहीत. चेअरमन प्रभाकरराव शिंदे यांनी हंगामाच्या सुरुवातीपासूनच वेळेवर पेमेंट देण्याची हमी दिली होती. ती आज प्रत्यक्षात पूर्ण करत बागायतदारहिताचे धोरण कारखान्याने जपल्याचे मानले जात आहे. वेळीच मिळालेल्या पेमेंटमुळे बागायतदारांना हंगामातील पुढील खर्चाची तरतूद सुलभ झाली असल्याचे सांगण्यात येत आहे.

**खाजगी वजन करण्याची परवानगी असल्याचा राज्यात पहिला मान: पंचगंगाकडे उसाचा वाढता ओढा पंचगंगा हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खाजगी वजनकाट्यावर ऊस वजन तोलण्याची प्रथमच मुभा देणारा कारखाना ठरला. त्यामुळे बागायतदारांचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. इतर कारखान्यांनीही अशीच मुभा द्यावी. अशी मागणी शेतकरी करत असून अन्यथा वजनकाट्यांमध्ये फेरफार होत असल्याचा संशय अधिक बळकट होतो.**


## नशिबाची परिक्षा

### बुधवार दि.०३ डिसेंबर २०२५

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१४५ २३५ ५५० — ०-३ — १२० ६७० ५८०

जोड: ०६-१३-२९-७५-३८

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१२० ६७० ५८० — ३-९ — २७० २८९ २२५

जोड: ३१-०९-६४-७५-९८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

१२४ १७९ ११५ — ७-० — १९० २८० २४४

जोड: ७१-४०-२६-९५-०८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

दखल

## काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात एड्स दिन साजरा

**ढोरजळगांव :-** आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात येथे १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू आणि उद्देश व महत्त्व प्रा.राजेंद्र बांगर यांनी सांगितले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आबासाहेब काकडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन



करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा.स्मिता नाईक यांनी जागतिक एड्स दिनाचे महत्त्व व उपयोगीता विविध उदाहरणादाखल सांगितले. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा.अनिता भालसिंग यांनी अध्यक्षीय समारोपात जागतिक एड्स दिनाचे महत्त्व व त्यावरील उपाय विद्यार्थ्यांना सांगितले. कु.वैष्णवी बर्डे, खरात प्रिया, कु. निकम शुभांगी, कु. महेश तोतरे, कु. काळे शिवानी यांनी आपले विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी कु. दौंड तृप्ती यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वीर वैष्णवी व कु. ससाणे निकिता यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. राजेंद्र बांगर, प्रा.राम नेव्हल ,प्रा. स्मिता नाईक, प्रा.अनिता भालसिंग,प्रा राजेंद्र काळे, कैलास धनवडे, कार्यालयीन कर्मचारी सतीश गोरे, राम गाडेकर, श्री.दीपक पवार आणि बी. एड. प्रथम वर्षाचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## आता २१ डिसेंबरला 'ड्राय डे'

**अहिल्यानगर :** राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीची मतमोजणी पुढे ढकलल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात आता ३ डिसेंबरऐवजी २१ डिसेंबर रोजी 'ड्राय डे' (ॲू.रू) असणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे सुधारित आदेश जारी केले आहेत.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मतमोजणीची तारीख बदलली आहे. त्यामुळे आता २१ डिसेंबरला मतमोजणी संपेपर्यंत खालील ठिकाणी मद्यविक्री बंद राहील:

संगमनेर, कोपरगांव, शिर्डी, राहाता, श्रीरामपूर, देवळाली प्रवरा, राहुरी, शेवगाव, पाथर्डी, जामखेड, श्रीगोंदा (नगरपरिषदा) आणि नेवासा (नगरपंचायत).या दिवशी सर्व देशी-विदेशी मद्यविक्री दुकाने व बीअर बार बंद राहतील. घाऊक विक्रेते (उङ-२/ऋङ-१) व उत्पादक कार्यरत राहू शकतील, परंतु त्यांना 'ड्राय डे' लागू असलेल्या क्षेत्रात मद्यपुरवठा करण्यास सक्त मनाई असणार आहे.



जि.प.प्रा.शाळा आरोळे वस्ती प्रभाक क्रमांक १२ येथे वृद्ध महिलेला मतदान केंद्रावर मतदान साठी घेऊन जाताना (छाया - समीर शेख जामखेड)



जामखेड:येथील एसपी इंग्लिश स्कुल येथे मतदान केंद्रावर नागरिकांच्या रांगा ( छाया - समीर शेख जामखेड)

## शेवगाव नगरपरिषदेसाठी ६८.९ टक्के मतदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव नगरपरिषद निवडणुकीमध्ये ४१ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. सायकांळी ५.३० पर्यत ३५हजार ४७९ पैकी २४हजार ४४३ असून ६८.९/ टक्के मतदान झाले होते. मात्र प्रभाग

क्र.१ ,५ ,६ अंतिम टक्केवारीची प्रतीक्षा आहेत. प्रभाग क्र. ५ मधून नगरपरीषद मधील यादी व बाहेरील नाव ,नंबर यामध्ये बुथमधील तफावत आली. या मतदानमध्ये प्रभाग क्र.३ मधून रुखमिनीबाई सर्जे वय १०६ यांनी व्ही चिअर मतदान करण्यासाठी हक्क बजावला. तसेच नगरपरीषद तर्फे व्हील चेअर व्यवस्था केली गेली तेथील एकनाथ रामभाऊ कुसळकर वय ९१ यांनी शेवगांव येथुन प्रभाग क्र. ७ मधून हक्क बजावला तसेच ग्रामीण रुगणाकडून औषधे उपचार साठी लागणारे टेबलेट ठेवण्यात आली.

नगराध्यक्ष पदासाठी ६ आणि नगरसेवक पदासाठी १०० उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद झाले. काही ठिकाणी लांब रांगा व मतदारांची मोठी गर्दी दिसून आली, तर उमेदवारांकडून मतदारांना मतदानासाठी आणण्यासाठी दिवसभर धावपळ सुरू होती.

किरकोळ वाद-विवाद वगळता निवडणूक शांततेत पार पडली. अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शहराला भेट देऊन बंदोबस्ताची पाहणी केली. तसेच पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली. न्यायालयीन प्रक्रियेमुळे निकाल १५ ते २० दिवस विलंबाने जाहीर होणार असल्याने उमेदवार 'वेट अँड वॉच' मोडमध्ये गेले आहेत. शेवगावकरांनी बुधवारी आपला मतदानाचा हक्क बजावला असून आता सर्वांचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे.

# जामखेडला बिबट्याच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :**तालुक्यातील बावी गावच्या शिवारात १ डिसेंबर रोजी सायंकाळी बिबट्याने हल्ला करत गंभीर जखमी केले आहे उषाबाई सौदागर चव्हाण (वय ४५) असे जखमी महिलेचे नाव असून त्यांना जामखेड ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे नेण्यात आले आहे.

तसेच बावी व फक्राबाद या भागातील सावता राऊत यांच्या तीन बोकडांचा बिबट्याने फडशा पाडला आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांनी वन विभाग कडे त्वरित बिबट्याची बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. सावरगाव येथील पोलीस पाटील तुषार चव्हाण यांच्या वस्तीवरील शेळी लांडग्याने अथवा बिबट्याने काल रात्री नऊच्या सुमारास जागेवर फाडून घेऊन गेला आहे राहत्या घरापासून केवळ ५० ते ६० फुटावर बांधलेल्या शेळीचा कसल्याही प्रकारचा आवाज आला नाही. हनुमान वस्ती येथील आठ दिवसापासून सिंगल फेज लाईट नसल्याकारणाने अंधाराचा फायदा घेऊन लांडगा अथवा बिबट्याने शेळीची शिकार केली त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

वन विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या लक्षात घेऊन तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करण्याचा तयारी करत आहे. नागरिकांमध्ये रात्री



एकट्याने फिरण्याचे टाळा आणि सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. या परिसरात बिबट्याचा वावर आणि त्याचा हल्ला चिंतेचा विषय ठरत आहे. ही घटना स्थानिक शेतकरी आणि गावकऱ्यांमध्ये भीती वाढवणारी ठरली असून वन विभागाकडून बिबट्याच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

## स्नेहबंध फाउंडेशनकडून गरजूंना उबदार ब्लँकेट वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर -** तापमानाचा पारा घसरला असून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. अशा कडाक्याच्या थंडीत पांघरून न घेता बाहेर रस्त्यावर झोपलेल्या गरजू व्यक्तींना स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने शहरात सुमारे ५० जणांना ब्लँकेट वाटप केले.

शहरात मागील काही दिवसांपासून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. शहराचा पारा १० अंश सेल्सीअसपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे रात्री सात वाजल्यानंतर दुकाने बंद होऊ लागली आहेत. मात्र, या परिस्थितीत निराधार, अनाथ, गरीब लोक रस्त्याच्या कडेला, दुकानाबाहेर कुडकुडत झोपत आहेत. तर काही व्यक्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक एवढेच नव्हे, तर सार्वजनिक चौकात जागा मिळेल त्या ठिकाणी रात्रीची झोप घेऊ लागले आहेत.



दरम्यान, कडाक्याच्या थंडीत होणारी स्थिती लक्षात घेऊन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी रात्रीच्या वेळी शहरातील सावेडी, पाईपलाईन रोड, दिल्लीगेट, मार्केट यार्ड, माळीवाडा, सार्वजनिक ठिकाणी तसेच बसस्थानक, रेल्वेस्थानक येथे जाऊन कडाक्याच्या थंडीत झोपलेल्या गरजूंच्या अंगावर ऊबदार चादर पांघरून त्यांना मायेची ऊब दिली. शहरात सुमारे ५० पेक्षा अधिक गरजूंना ऊबदार चादर वाटप करण्यात आली. यावेळी सचिन पेंडुरकर, संकेत शेलार, आयुष लालबोन्द्रे, अंकुश गोत्राळ उपस्थित होते.

गरजूंच्या चेहऱ्यावरील हास्य समाधान देऊन गेले. थंडीच्या काळात उबदार पांघरून मिळाल्यानंतर गरजूंच्या चेहऱ्यावरील हास्य समाधान देऊन गेल्याचं स्नेहबंध सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले. त्यांच्या सामाजिक कार्याचे नागरिकांकडून कौतूक केले जात आहे.

## पोलिस मित्र समितीचा संवाद मेळावा कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** प्रिषा फाउंडेशन सलग्न पोलीस मित्र समिती महाराष्ट्र राज्य आयोजित सन्मानपत्र, ओळखपत्र, नियुक्तीपत्र आणि संवाद स्नेहमेळावा कार्यक्रम मोठ्या दिमाखात रोडेवाडी आंबेगाव येथे रविवार दि.३० नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.

आंबेगाव तालुका अध्यक्ष विकास गायकवाड यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भीमा शंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन देवदत्त निकम यांची कन्या मीनलता वाळुंज होत्या.

शिवछत्रपतींच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन करून स्वागत गीताने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमांचे अध्यक्ष गणेश सातपुते तर उपाध्यक्ष लालचंदजी थोरात यांनी प्रास्ताविक केले, उपस्थितांना मार्गदर्शन करून पोलीस मित्र समितीचे कार्य, ध्येय धोरणे, उद्दिष्ट यावर भाष्य केले. पोलीस मित्र समितीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्त पत्र तसेच सभासद बंधू भगिनींना ओळखपत्र आणि गायकवाड, प्रदिप मेरगळ यांसह पदाधिकाऱ्यांना सन्मानपत्र, नियुक्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांचे आभार निरगुडसर चे सरपंच रविंद्र वळसे

यावेळी उपस्थित पोलिस मित्र समिती पदाधिकारी अभिमान खेडकर, प्रिती दोन्हे, अश्विनी साकोरे, विनायक जाधव, अनिल गिरी गोसावी, विशाल टेमगिरे यांसह पोंदेवाडी चे सरपंच जयसिंगराव पोंदे आदी समितीचे पदाधिकारी आणि समितीचे विश्वस्त, सभासद तसेच आंबेगाव पंचक्रोशीतील ग्रामस्थ विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अशी माहिती प्रसारमाध्यमांना पोलिस मित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रदिप हिवाळे यांनी दिली

## ''एआय''च्या दुनियेत प्रोग्रेस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची झेप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:**नालबंदखुंट प्रोग्रेस अकॅडमी आयोजित विज्ञान व तंत्रज्ञान प्रदर्शनात कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आणि प्रगत तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांनी उपस्थित मान्यवरांची मनं जिंकली. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संकल्पना आणि भविष्यकालीन तंत्रज्ञान यांचा संगम साधत सादर केलेली प्रत्यक्ष मॉडेल्स सर्वांचे लक्षवेधी ठरली.



प्रदर्शनात फायर फायटर सिस्टम, स्मार्ट सिटी मॉडेल, डिझास्टर अलर्ट सिस्टम, गॅस लीकेज ट्रॅकर, ऑटोमॅटिक स्ट्रीट लाईट, वॉटर लेव्हल इंडिकेटर, क्लॅप कंट्रोल लाईट, स्मार्ट डस्टबिन, स्मार्ट प्लांट वॉटरिंग सिस्टम, ऑब्स्टॅकल अव्हॉइडिंग रोबोट आणि होम ऑटोमेशन सिस्टम यांसारख्या तंत्रज्ञान आधारित प्रकल्पांची प्रभावी सादरीकरणे पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांनी कल्पकता, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अप्रतिम मेळ साधला.

या प्रसंगी मुफ्ती अल्ताफ मोमिन, डॉ. परवेज अशरफी, सोलापूरे सर, भंडारी, आमिर सय्यद, रिझवान सर, शर्फुद्दीन शेख, अकबर , ॲड. तन्वीर आदी मान्यवरांनी प्रकल्पांचे परीक्षण करून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती आणि मेहनतीचे कौतुक केले. प्रदर्शनाचे मुख्य संयोजक सलमान ताज बगवान म्हणाले, विद्यार्थ्यांनी तयार केलेले हे प्रकल्प भविष्यातील तंत्रज्ञानाची दिशा दर्शवतात. त्यांची कष्टशीलता, शोधक वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रशंसनीय असून त्यातून नव्या पिढीचा आत्मविश्वास

## थंडी वाढल्यामुळे श्रीगोंदा तालुका गारठला !

### गहू, हरभऱ्याला पोषक वातावरण

नंदकुमार कुरुमकर । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :**थंडीचे प्रमाण गेल्या दोन ते तीन दिवसापासून वाढल्यामुळे श्रीगोंदा तालुका गारठला गेला आहे. दरम्यान चालू वर्षी अतिवृष्टीचे प्रमाण जास्त असल्यामुळे या वर्षी थंडी अधिक जाणवणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात येत होता. तो आता तंतोतंत खरा ठरला जात आहे. त्यामध्ये गेल्या दोन दिवसापासून सायंकाळी पाच ते सकाळी नऊ वाजेपर्यंत थंडी अधिक वाढल्याने सर्वांनाच हुडहुडी जाणवू लागले आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी गावोगावी शेकोटीचे प्रमाण देखील वाढले आहे. वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार रब्बी हंगामातील गहू, हरभरा, मका इत्यादी पिकांना थंडी पोषक ठरते. थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे चालू वर्षी गव्हाच्या पेरण्या देखील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी केली आहे. गव्हाची उगवण देखील थंडीमुळे समाधानकारक दिसून येत आहे. थंडीच्या कालावधीत गहू, हरभरा या पिकांना पाणी देखील कमी लागते. शेतकऱ्यांनी उत्कृष्ट जातीच्या गहू हरभऱ्याच्या बियाण्यांची पेरणी केली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कृषी सहाय्यका मार्फत गहू हरभऱ्याच्या बियाण्यांची पेरणीसाठी पसंती केली आहे. त्यामुळे चालू वर्षी गहू हरभरा पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी केल्याचे दिसून येत आहे.

शेतकऱ्यांचे म्हणण्यानुसार चालू वर्षी अतिवृष्टीमुळे पाण्याची कमतरता अद्याप तरी जाणवत नाही. विहिरी कुपनलिका यांना मुबलक असा पाणीसाठा आहे. वीजपुरवठा देखील वेळेनुसार उपलब्ध होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून येत आहे. यंदा गव्हाचे उत्पन्नात देखील मोठी वाढ होऊ शकते. कारण सध्या तरी दुही सारखे प्रमाण नसल्याने उगवण झालेल्या पिकांवर कसलाही दुष्परिणाम दिसून येत नाही. असे शेतकरी सांगतात. तरी देखील शेतकरी उगवण युक्त पिकांना विविध प्रकारच्या औषधांची फवारणी करताना शेतकरी दिसत आहेत. चालू वर्षी अतिवृष्टीमुळे ज्वारीचे पीक नेसतानाबूत झाले आहे. त्यामुळे वर्षभर धान्य उपलब्ध होईल यासाठी चालू वर्षी श्रीगोंदा तालुक्यात गव्हाची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली आहे. सद्यस्थितीला श्रीगोंदा तालुक्याला वरदान ठरलेल्या घोड व कुकडीची धरणे देखील समाधानकारक भरले आहेत. साधारणता वीस ते पंचवीस दिवसानंतर या दोन्हीही धरणातील पाण्याचे रोटेशन सोडले तर निश्चितपणे पिकांना दिलासा मिळू शकेल. असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. विहिरी व कुपनलिकांना देखील मुबलक पाणीसाठा उपलब्ध होईल यासाठी घोड व कुकडीच्या अधिकाऱ्यांनी आतापासूनच आवर्तना संदर्भात आढावा घेण्याची आवश्यकता असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामध्ये कुकडी लाभ क्षेत्रात शेतकऱ्यांची प्रत्येक वर्षी आवर्तन कालावधीमध्ये हेळसांड होते. यावर्षी संबंधित जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना सतर्क राहावे लागेल. या लाभक्षेत्रात पाणी वापर संस्थांकडे पाणी हस्तंतरित केल्याचे सांगितले जाते. या कालावधीत श्रीगोंदा तालुक्यात आवर्तन सोडले जाते.

## निमगाव वाघात १२ जानेवारी रोजी रंगणार चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर -** स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त १२ जानेवारी रोजी चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.





या संमेलनात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, धार्मिक, साहित्य, वैद्यकिय व पर्यावरण संवर्धनावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व सामाजिक संस्थांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले जाणार असून, पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे व युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदिप डोंगरे यांनी केले आहे. दरवर्षी प्रमाणे संस्थेच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताह विविध उपक्रमांनी निमगाव वाघा (ता. जि. नगर) येथे उत्साहात साजरा केला जाणार आहे. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद ज्ञान गौरव पुरस्कार, समाज गौरव, क्रीडा रत्न व युवा गौरव, राष्ट्रमाता जिजाऊ नारी शक्ती पुरस्कार तसेच साहित्य क्षेत्रात काव्य प्रतिभा पुरस्कार प्रदान केले जाणार आहे. या पुरस्कारांसाठी २० डिसेंबर पर्यंत प्रस्ताव पाठवायचे आहे. प्रस्ताव पाठविण्यासाठी संस्थेचे कार्यालय स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था (अध्यक्ष, पै.नाना डोफ्लगरे), निमगाव वाघा ता. जि. अहिल्यानगर या पत्त्यावर पाठवावे .

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव येथे महात्मा जोतिराव फुले यांना अभिवादन

**लिंपणगाव:** श्रीगोंदा तालुक्यातील घारगाव श्री दत्तकृपा शैक्षणिक व कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव येथे समाजसुधारक, महात्मा जोतिराव गोविंद फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. समाजातील अस्पृश्यता, अंधश्रद्धा, शिक्षणातील विषमता आणि स्त्रीशिक्षणासाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या फुलेंच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांना सामाजिक भान निर्माण करण्याचा उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमास दत्तकृपा शैक्षणिक संकुलाच्या सचिव. अर्चनाताई पानसरे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महात्मा फुलेंच्या कार्याचा जागर प्रस्तावित करताना विद्यार्थ्यांनी समाजपरिवर्तनासाठी शिक्षणाचे महत्त्व समजून घेत पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मच्छिंद्र गोंटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महात्मा फुलेंच्या समतावादी विचारसरणीचा आढावा घेतला. ''फुले दांपत्याने शिक्षणाच्या माध्यमातून सर्वसमावेशक समाज उभारणीचा मार्ग दाखविला. त्या विचारांचे अनुकरण विद्यार्थी-शिक्षकांनी करणे हीच खऱ्या अर्थाने त्यांना वाहिलेली आदरांजली ठरेल,'' असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून साईकृपा फार्मसी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका . नेहा गरुड उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना महात्मा फुले यांनी शिक्षणाचा केलेला जागर समाजाच्या प्रगतीचा पाया असल्याचे सांगितले. आजच्या पिढीने डिजिटल युगातील बदलांसोबत सामाजिक जबाबदारीही जोपासली पाहिजे, असे त्यांनी मत व्यक्त केले.महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रा. राठोड, प्राध्यापिका गायकवाड, प्राध्यापिका राजश्री शिंदे, अवघडे वैशाली , कर्णे ए., प्रा. सतीश शेलार, प्रा. आहेर गोरक्ष, प्रा. गोरे सत्यम, प्रा. स्वप्निल शिंदे, प्रा. कोळेकर तुषार व प्रा. गावडे निखिल उपस्थित होते. सर्वांनी संयुक्तपणे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कृष्णप्रिया शिर्के व वर्षा सुपेकर यांनी अत्यंत नेटक्या पद्धतीने केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रणसिंग रमेश यांनी केले. एम.एड व बी.एड विभागातील विद्यार्थी यादव लहू, शेलार मयूर, प्रतिभा कांबळे, आचल नाडे, शामल चौरे व अतुल भोर यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुलेंच्या आदर्शांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. महात्मा फुलेंच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. प्रेरणादायी वातावरणात आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देत कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## जिल्ह्यात २ ते ४ डिसेंबर दरम्यान थंडीच्या लाटेची शक्यता

### नागरिकांनी दक्षता घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर-** जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत कडाक्याची थंडी पडत असून जिल्ह्याचे किमान तापमान १० सेल्सिअस पेक्षा कमी झाल्याचे हवामान खात्याच्या नोंदीनुसार दिसून आलेले आहे. दि. २ ते ४ डिसेंबर २०२५ दरम्यान जिल्ह्यात काही ठिकाणी तीव्र थंडीच्या लाटेची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून जिल्ह्यासाठी ''येलो अलर्ट'' प्रसारीत करण्यात आला आहे. नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

थंडीपासून बचावासाठी नागरिकांनी खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी थंडीच्या लाटेबाबत स्थानिक हवामानाच्या अंदाजाची रेडिओ, टी.व्ही. व वर्तमानपत्रामध्ये प्रसारीत होणा-या बातम्यांद्वारे माहिती मिळवावी. हिवाळ्यामध्ये स्वेटर, मफलर, कानटोपी, हात व पायमोजे तसेच रग, चादर यासारखे इतर पुरेसे उबदार कपडे वापरावेत. थंडीची लाट आली असताना शक्यतो घरातच थांबावे, थंड वाऱ्यापासून बचावासाठी शक्यतो प्रवास टाळावा. स्वतःला कोरडे ठेवावे. शरीर ओले असल्यास त्वरीत कपडे बदलावे, ज्याद्वारे शरीरातील उष्णता कमी होणार नाही. शरीराचे तापमान समतोल राखण्यासाठी निरोगी अन्न खावे. पुरेशी प्रतिकारशक्ती राखण्यासाठी व्हिटॅमिन - सी समृध्द फळे आणि भाज्या खाव्यात. नियमितपणे गरम द्रव्य / पेय प्यावे, कारण यामुळे थंडी दरम्यान शरीरातील उष्णता कायम राहील.

घरातील वृध्द लोकांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. थंडीत दीर्घकाळ राहिल्यास त्वचा निस्तेज आणि बधीर होऊ शकते. निस्तेज पडलेली हातापायांची बोटे, कानाची पाळी व नाकाचा शेंडा इ. लक्षणांकडे लक्ष द्यावे व अशा वेळी त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. थंडीने शरीराचा थरकाप होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे शरीराचे तापमान कमी होण्याचे लक्षण असलेने तात्काळ खुल्या जागेतून निवा-याच्या ठिकाणी जावे. परिस्थिती बिघडत असल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत. पाळीव प्राण्यांना घरामध्ये व सुरक्षित ठिकाणी हलवावे तसेच पशुधन किंवा पाळीव प्राण्यांचे थंड हवामानापासून संरक्षण करावे.

नागरिकांनी हिवाळ्याच्या कालावधीत स्वतः सह जनावरांचे थंडीपासून संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. स्थानिक प्रशासनाद्वारे वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करावे तसेच आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे आरोग्य केंद्र, रूग्णालय वा १०८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## द•ख•ल

# वधूवर सूचक मंडळाचे सामाजिक कार्य कौतुकास्पद : वसंत कवाद

**निघोज:** निघोज आणी पंचक्रोशीतील गाव व परिसरात दोनशे पेक्षा जास्त विवाह जमवून आणण्यासाठी प्रयत्न करणारे वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष राजूकाका देशपांडे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद यांनी व्यक्त केले आहे.



देशपांडे यांना सेनापती बापट पुरस्कार मिळाला असून त्यांचा खा. नीलेश लंके यांच्या हस्ते गौरविण्यात आले याबद्दल त्यांचा ट्रस्ट वतीने अध्यक्ष कवाद, कोषाध्यक्ष रामदासशेठ वरखडे, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वासराव शेटे, संघटक मंगेश वराळ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कवाद बोलत होते. यावेळी विश्वस्त ॲड ज्ञानेश्वर लामखडे, बबनराव ससाणे, अनिल शेटे, ज्ञानेश्वर लंके, शंकरराव लामखडे, रमेश आण्णा ढवळे, अनिल लंके, आशाताई वरखडे, सिमाताई वराळ, व्यवस्थापक महेश ढवळे आदी उपस्थित होते. अध्यक्ष कवाद सर यावेळी म्हणाले पुरस्कार मिळाल्याच्या आनंद प्रित्यर्थ राजूकाका देशपांडे यांनी ट्रस्ट संचालित प्रसादालयालयासाठी देणगी दिली. हा खरा परमार्थीक आनंद साजरा करण्याची एक समाजसेवी सेवाभावी पद्धत आहे. वाढदिवस असो किंवा सुख दुखात सहभागी होऊन ते सामाजिक काम करतात. म्हणून पुरस्कार समीतीचे आयोजक अर्जुन भालेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सेनापती बापट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ही निघोज गावांसाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव शांताराम कळसकर यांनी केले शेवटी विश्वस्त शंकरराव लामखडे व विश्वस्त ॲड. ज्ञानेश्वर लामखडे यांनी आभार मानले.

# भोर येथून श्री दत्त जयंतीसाठी पालख्यांचे प्रस्थान

**भोर:** शहर व तालुक्यातील भाविकांच्या पायी दिंडी डरे जाणाऱ्या श्री गुरुदत्तांच्या पालखीचे श्री क्षेत्र नारायणपूरकडे प्रस्थान झाले.यामध्ये प्रामुख्याने शहरातील कुंभार टेकडी सार्वजनिक तालीम मंडळ व परहर पंचक्रोशी येथील पालखींचा समावेश आहे.पायी दिंडी मध्ये जेष्ठ नागरिक, महिला आणि युवक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले आहेत.मान्यवरांच्या शुभहस्ते आरती झाल्यानंतर कुंभार टेकडी तालीम मंडळ येथील दिंडीला



सुरुवात झाली. सजावट केलेल्या पादुका पालखीमध्ये ठेवून ''श्रीपाद श्री वल्लभ दिगंबरा '' असा जयघोष होऊन पालखीचे उत्साहात प्रस्थान संपन्न झाले. यावर्षी कुंभार टेकडी सार्वजनिक तालीम मंडळाचे ३७ वे वर्ष आहे .तालुक्यातील शिंद येथील श्री गुरुकुल संस्थेमधील विद्यार्थी मोठ्या आनंदात भजन व हरिनामाचा गजर करत सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेत पायी पालखीमध्ये सहभागी झाले. तरुण , तरुणी, महिलांसोबत जेष्ठ नागरिक भजन गात मोठ्या उत्साहात सहभागी होऊन श्री दत्तगुरूंच्या नामाचा जयघोष करत पायीदिंडीत सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले.शहर आणि परिसरातील दत्त भक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आज (दि.२ ) पालखी तेलवडी (ता.भोर ) येथे ग्रामदैवत भैरवनाथ मंदिर परिसरात मुक्काम केल्यानंतर उदया सकाळी पालखी तेलवडी येथून मार्गस्थ होऊन श्री क्षेत्र नारायणपूर येथे दुपारपर्यंत दत्त जयंती उत्सवासाठी पोहोचणार असल्याचे श्री दत्त सेवेकरी समीर घोडेकर यांनी सांगितले.

# गावठी पिस्तूलासह दहशत माजवणारा संशयित जेरबंद

## वेळीच कारवाईमुळे गुन्हा टळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** शहरात नगरपालिका निवडणूक २०२५ च्या आचारसंहितेच्या कालावधीत बेकायदेशीर शस्त्र बाळगून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयिताला बारामती शहर पोलिसांनी जेरबंद केले आहे. संशयिताकडून एक गावठी पिस्तूल, चार जिवंत काडतूस आणि मॅगझिन असा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ नोव्हेंबर रोजी गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सतीश राऊत, पोलीस अंमलदार अमीर शेख, दत्तात्रय मदने व इतर पथक अमराई भागात पेट्रोलिंग करत असताना, जनहित प्रतिष्ठान शाळेजवळ एक इसम बेकायदेशीर शस्त्रासह फिरत असल्याची गुप्त माहिती पोलिस उपनिरीक्षक राऊत यांना मिळाली. त्यांनी तत्काळ सदर माहिती प्रभारी पोलीस निरीक्षक चिवडशेट्टी यांना कळवली. मिळालेल्या आदेशानुसार पथकाने सापळा रचून संशयितास ताब्यात घेतले.

पंचासमक्ष घेतलेल्या अंगझडतीत संशयिताकडे एक गावठी पिस्तूल, चार जिवंत काडतूस आणि मॅगझिन असा मुद्देमाल मिळून आला. त्याची ओळख प्रदीप सुरेश नकाते (वय:२७ वर्षे, रा. ऋतुसृष्टी अपार्टमेंट, प्रगतीनगर, बारामती) अशी करण्यात आली. या प्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे आर्म ॲक्ट नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता आरोपीस पोलीस कोठडी दिली असून चौकशीदरम्यान आरोपीने शस्त्र कोठून मिळविले यासंबंधीची माहिती पोलिसांना दिली आहे. शस्त्र पुरवठादाराचे तपास पथकाकडून सक्रियपणे शोधकार्य सुरू असून त्यास लवकरच ताब्यात घेतले जाणार आहे.

अटक आरोपीने शस्त्र कोणत्या हेतूने जवळ बाळगले होते याबाबतही सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश राऊत यांच्या मार्फत पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

''बेकायदा शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध पोलिसांचा कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. बारामती शहरात कुणीही बेकायदेशीर शस्त्रे बाळगत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

**श्रीशैल चिवडशेट्टी**
**(पोलीस निरीक्षक, बारामती शहर)**

# तिकिटातील तफावत लक्षणीय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती-** पुणे साध्या गाडीचे १७७ रुपये, हिरकणीचे २३८, शिवशाही बसचे २६४, तर नव्याने सुरू झालेल्या शिवाई गाडीचे तिकीट २८१ रुपये आहे. दुसरीकडे रेल्वेचा महिन्याचा पास अवघ्या ४४० रुपयात मिळतो. याचाच अर्थ महिनाभर दररोज रेल्वेने प्रवास केल्यास ये-जा करून १५ रुपयातच प्रवास होतो. रेल्वेचे बारामती-पुणे तिकीट ३० रुपये आहे.

स्वस्त व कमी वेळेत प्रवास हवा बारामतीहून पुण्याला दैनंदिन कामकाजासाठी जाणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. अनेकांना बसपेक्षा रेल्वेचा प्रवास सुखकारक वाटतो. या पार्श्वभूमीवर बारामती- दौंड- पुणे अशी वेगवान लोकलसेवा सुरू केली, तर बारामतीकरांना त्याचा सर्वाधिक लाभ होईल.

**व्यापारउदीम अधिक वृद्धींगत व्हावा, कमी खर्चात लवकर पोहोचणारे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे साधन म्हणून लोकल सेवा गरजेची आहे.**

**-सुशील सोमाणी, अध्यक्ष,**
**बारामती व्यापारी महासंघ**

**लोकलसेवेमुळे लोकांचा वेळ व पैसा या दोन्हीचीही बचतच होईल, वाहतूक कोंडीचा त्रास या मुळे टळेल. लवकर ही सेवा सुरु व्हावी.**

**- संभाजी किर्वे,**
**मर्चंटस असोसिएशन, बारामती**

# बारामती- पुणे लोकलसेवा सुरू करण्याची मागणी

**बारामती :** शहरातील नागरिकांना महत्त्वाच्या सर्व कामांसाठी जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या पुण्याला सातत्याने जावे लागते. बारामतीहून पुण्याला स्वस्तात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे साधन म्हणून जलद बारामती-पुणे लोकल सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. ही लोकल सेवा सुरू झाल्यास हजारो प्रवाशांना त्याचा फायदा होणार असून, पंचक्रोशीतून नागरिक या जलद लोकलसेवेचा लाभ घेतील. रस्तेमार्गे पुण्याला जाण्यासाठी लागणाऱ्या वेळेपेक्षा कमी वेळेत व कमी खर्चात हा प्रवास सुरू झाल्यास त्याचा फायदा बारामतीकरांना होईल, या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी व प्रशासनाने या प्रस्तावाचा विचार करावा, असे नागरिकांचे मत आहे.

सकाळी लवकर निघून कार्यालयीन वेळेपर्यंत पुण्यात पोहोचता येईल व दिवसभराची कामे आटोपून संध्याकाळी पुन्हा पुण्याहून बारामतीला परत येता येईल, असे या लोकलचे वेळापत्रक असावे, अशी नागरिकांची मागणी आहे. सध्या हा प्रवास तीन तासांहून अधिक काळचा असल्याने अनेकजण रेल्वेचा प्रवास टाळतात. वेगवान लोकल सुरू झाली तर प्रवासी संख्याही वाढेल आणि प्रवाशांच्या वेळेत बचतही होईल. राज्य परिवहन मंडळाच्या बसचे तिकीट हे रेल्वेच्या तिकीटाहून कमालीचे महाग आहे. एसटी बसने प्रवास केल्यासही सव्वा दोन ते अडीच तासांचा कालावधी लागतो. त्यामुळे काहीजण रेल्वेला प्राधान्य देतात. हा रेल्वे प्रवास दोन तासांवर आणावा, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

# ज्येष्ठ नागरिकांची लाखोंची फसवणूक करणारा आरोपी अखेर जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** शहरातील ज्येष्ठ नागरिकांना पर्यटनाचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक करणाऱ्या फरार आरोपीस दोन वर्षांच्या सततच्या पोलिस शोधमोहीमेनंतर अखेर बारामती शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. आदम मेहबूब सय्यद (रा. पवारवाडी, ता. फलटण, जि. सातारा) असे ताब्यात घेण्यात आलेल्याचे इसमाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२३ मध्ये ज्येष्ठ नागरिकांना सिक्कीम – दार्जिलिंग पर्यटन टूर आयोजित करुन देतो असे आमिष दाखवत, वेळोवेळी २ लाख १० हजार रुपये घेऊन त्यांचा अपहार करणाऱ्या इसमाविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन येथे २०२३ मध्ये भा.दं.सं नुसार दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील आरोपी तो इसम आदम मेहबूब सय्यद (रा. पवारवाडी, ता. फलटण, जि. सातारा) हा गुन्हा दाखल झाल्यापासून सतत ठिकाणे बदलत होता, पोलिसांना दिशाभूल करत पळ काढत होता आणि दोन वर्षे फरार होता. बारामती शहर पोलिसांच्या पथकातील पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, सुलतान डांगे, पोलीस शिपाई पोपट कवीतके, गिरीष नेवसे यांनी अथक परिश्रम करून, तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती, आणि सततच्या पाठपुराव्याद्वारे आरोपीच्या हालचालींचा मागोवा घेतला. १ डिसेंबर २०२५ रोजी आरोपी आपल्या राहत्या घरी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पथकाने शिताफीने सापळा रचला. व पवारवाडी येथील राहत्या घराजवळून आरोपीस जेरबंद करण्यात आले. सध्या हा गुन्हा महिला पोलीस उपनिरीक्षक संध्याराणी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपासला जात असून, आरोपीने इतर व्यक्तींचीही अशा प्रकारे फसवणूक केली आहे का, याचा सखोल तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे आवाहन पर्यटन, गुंतवणूक, लॉटरी किंवा अन्य कोणतेही आर्थिक आमिष दाखवून फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक चिवडशेट्टी यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

# चैन स्नॅचिंग करणाऱ्या रेकॉर्डवरील आरोपीला आंबेगाव पोलिसांनी केले जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** शहरातील आंबेगाव पोलिसांनी कारवाई करताना चैन स्नॅचिंग करणाऱ्या रेकॉर्डवरील आरोपीला जेरबंद करून पाच गुन्हे उघडकीस आणले आहेत. फिर्यादी हे ०२ मे २०२५ रोजी रात्रीच्या वेळी जुना सातारा पुणे रोड वरील गुजरवाडी जवळ त्यांची मोपेड गाडी ही रस्ताच्या कडेला पार्क करून झोपलेले असतांना फिर्यादी यांच्या खिशातील मोबाईल व त्यांची मोपेड गाडी ही चोरट्याने चोरुन नेली होती.त्या बाबत आंबेगाव पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील अज्ञात चोरटयाचा पोलिस अंमलदार हनुमंत मासाळ व चेतन गोरे हे शोध घेत असतांना त्यांना मिळालेल्या बातमी प्रमाणे सदरचा गुन्हा हा रेकॉर्ड वरील आरोपी आकाश नरहरी शिंदे (रा. जाधवनगर, वडगाव बु पुणे) याने केला असल्याची माहिती मिळवली. तो दरी पुलाच्या जवळ येणार

असल्याची माहिती गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाल्याने त्यास वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने व पोलिस उप निरीक्षक कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा लावून ताब्यात घेतले आहे.

आरोपीने आंबेगाव, सिहगड पोलिस स्टेशन, पुणे शहर तसेच बावधन पोलिस स्टेशन (पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय) हददीत चैन स्नॅचींग (जबरी चोरी) केले असल्याचे तसेच तो खडक पोलिस स्टेशन कडील चैन स्नॅचींगच्या गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदरच्या अटक आरोपी याचे कडून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडून आंबेगाव व सिहगड पोलिस स्टेशन कडील वर नमुद चैन स्नॅचींग गुन्हयातील सोन्याचा मुद्देमाल व आरोपी याने गुन्हा करण्यासाठी यापरलेली मोपेड गाडी असा ३लाख, ९२हजार,०००/-रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, रंजनकुमार शर्मा, सह पोलिस आयुक्त, पुणे शहर, राजेश बनसोडे, अपर पोलिस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, मिलींद मोहिते, पोलिस उपआयुक्त परिमंडळ – २ पुणे शहर, राहुल आवारे, सहा. पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली आंबेगाव पोलिस स्टेशनचे शरद झिने, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, गजानन चोरमले, पोलिस निरीक्षक (गुन्हे), पोलिस उपनिरीक्षक मोहन कळमकर तसेच पोलिस अंमलदार शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, निलेश जमदाडे, हरिश गायकवाड, सुभाष मोरे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, ज्ञानेश्वर चित्ते, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे, शिवाजी पाटोळे, अजय कामठे, प्रमोद भोसले, राकेश टेकवडे यांच्या पथकाने केली आहे.

# ज्ञानेश्वरी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वाघोली-** ज्ञानेश्वरी ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल यांचं अंकुशराव लांडगे सभागृह भोसरी येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचा भव्य आणि उत्साहवर्धक कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक दिगंबर ढोकले सर,भूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.कैलास पवार, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी सभागृहातील उपस्थितांची दाद मिळवली. रंगतदार नृत्यस्पर्धा,देशभक्तीपर गीते, नाटिका, कोवळ्या कलावंतांची कला-सादरीकरणे, आणि आधुनिक काळाशी सुसंगत अशा संकल्पनांवर आधारित कार्यक्रमांनी वातावरण रंगले.यावेळी मान्यवरांपैकी प्राध्यापक दिगंबर डोकले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

# तपोवनातील १८०० झाडांची कत्तल म्हणजे १८ लाख लोकांचा व पशुपक्षांचा श्वास कोंडणे: सावधान

२०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे.त्याची जोरदार तयारी सुरू आहे.कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधू-महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनात साधूग्राम तयार केले जात आहे.त्यासाठी तब्बल १८०० वृक्षांची कत्तल केली जाणार आहे म्हणजे निसर्गाची खुली हत्या.या नाशिक मनपा प्रशासनाच्या व सरकारच्या निर्णयाचा साधू-महंतांनी कडाडून विरोध करायला हवा.कारण साधू-महंतांचे वास्तव मुख्यत्वे करून हे वृक्षांच्या सानिध्यात असते. नाशिकच्या तपोवनाचा इतिहास रामायणाशी सुध्दा जुळला आहे.याच तपोवनात भगवान राम,सीता आणि लक्ष्मण यांनी त्यांच्या १४ वर्षाच्या वनवासातील बराचसा काळ याठिकाणी घालवीला होता. त्यामुळे हे पावण स्थळ राज्यासाठीच नाही तर देशासाठी व जगासाठी ऐतिहासिक स्थळ मानल्या जाते. त्याचप्रमाणे याच स्थळी लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले होते असेही सांगितले जाते. आपण रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी अयोध्येत भव्य राममंदिर उभारले ही देशासाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली बाब आहे.परंतु ज्या तपोवनात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांचा सहवास होता आणि लक्ष्मणाने ज्या ठिकाणी शूर्पणखेचे नाक कापले अशा ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तव्याला जर मनपा प्रशासन व सरकार १८०० वृक्ष कापून काडीमोड करून नेस्तनाबूत करीत असेल तर ही कसली रामराज्य प्रस्थापित करण्याची भाषा? तपोवनातील एक जरी वृक्ष कटत असेल तर हा मानवजातीवर,पशूपक्षांवर,निसर्गावर, पौराणिक कथांवर व देशातील जनतेच्या भावनांवर मोठा प्रहार समजल्या जाईल. आपण जेव्हा रामराज्याची कल्पना करतो तेव्हा सर्वच बाजूंचा विचार सरकारने केला पाहिजे.यात स्वतःचे स्वार्थ साधून चालणार नाही.प्रश्न रहाला साधू महंतांच्या वास्तव्याचा यासाठी अनेक पर्यायी व्यवस्था नाशिक मनपा प्रशासन व सरकार जवळ आहेत.पटांगत, ग्राउंड,शासकीय कॉटेजेस, धर्मशाळा असे अनेक पर्याय आहेत.परंतु साधू महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील १८०० वृक्षांची हत्या करून साधूग्राम तयार करने म्हणजे निसर्गाची खुली हत्याच म्हणावी लागेल. आज आपण पहात आहोत की,देशासह जगात बदलत्या हवामानामुळे महाप्रलय, सुनामी , अती पाऊस,अती उष्णता यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि हा संपूर्ण प्रकार जंगल कटाई व वृक्षतोडीमुळे होत ही बाब सर्वांच्या डोळ्यासमोर आहे तरीही नाशिकमधील ऐतिहासिक तपोवनातील १८०० वृक्षांची कत्तल करण्यासाठी नाशिक प्रशासन व सरकार हिरवी झेंडी देत ही अत्यंत दुर्भाग्य पुर्ण बाब आहे.ही अशी गोष्ट झाली की ''आ बैल मुझे मार'' सरकार सांगते की झाडे लावा झाडे जगवा आणि स्वतःच्या स्वार्थासाठी तब्बल १८०० झाडांची कत्तल करायची हा कुठला न्याय म्हणावा!आज एक वृक्ष लावले तर त्याला मोठे व्हायला ५ ते १० वर्षे लागतात आणि नाशिक मनपा प्रशासन व सरकार एकाच वेळेस १८०० वृक्ष कापण्याचा आदेश देत आहे ही फक्त नाशिकलाच नाही तर देशाला घातक सिद्ध होवू शकते. त्यामुळे तपोवनातील वृक्ष तोडण्याच्या पहिले सरकारने हजार वेळा विचार केला पाहिजे की १८०० वृक्षांची जर कत्तल झाली तर मानव व पशुपक्षांवर याचा किती मोठा विपरीत परिणाम होईल याची जाणीव मनपा प्रशासन व सरकार ठेवली पाहिजे. वृक्षांच्या बाबतीत ''हम करे सो कायदा'' कोन्हीही सहन करणार नाही हेही सरकारने लक्षात ठेवले पाहिजे.आज देशातील वाढते शहरीकरण व औद्योगिकरणामुळे देशातील अनेक राज्य प्रदुषणाच्या झोन आले आहे आणि आज प्रदुषणाच्या बाबतीत देशाची राजधानी दिल्ली गॅसचेंबर बनली आहे ही बाब जगजाहीर आहे. आज देशातील व राज्यातील वृक्षतोडीमुळे प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे.जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून भयभीत आहे.हा संपूर्ण प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे आणि आता जर तपोवनातील १८०० वृक्ष जर तोडल्या गेली तर याचा मोठा फटका नाशिककरांना भोगावा लागेल.त्यामुळे तपोवनातील एकही वृक्ष कटणार नाही याची जबाबदारी सर्वप्रथम मनपा प्रशासनने घेतली पाहिजे,मनपा प्रशासन जर आपली मनमानी करीत असेल नाशिकातील प्रत्येक नागरिकांनी या वृक्ष तोडीचा कडाडून विरोध केला पाहिजे.ही आनंदाची गोष्ट आहे की नाशिककर, निसर्गप्रेमी,समाजसेवी संघटना, अनेक राजकीय पक्ष तपोवनातील वृक्ष तोडीच्या विरोधात उभे ठाकले आहे आणि आता या आंदोलनाला मोठे बळ मिळले आहे वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यामुळे.तपोवनातील वृक्षतोडीच्या निर्णयाला सडेतोड इशारा देवतांना सयाजी शिंदे म्हणतात की, एक जरी झाड तोडले तर १०० जणांचे बलिदान देवू.त्यामुळे सावधान नाशिक मनपा प्रशासन व सरकार वृक्ष लावने शिका व वृक्ष तोडने टाळा.आज राज्यातील प्रत्येक शहरापासून ३० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण झालेले आहे.यामुळे लाखोंच्या संख्येने झाडांची खुलेआम कत्तल सरकारने केली आणि याचे प्रायश्चित्त राज्याच्या जनतेला प्रदुषणाच्या माध्यमातून भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे अनेक हिंसक पशु शहराकडे धाव घेत आहेत हा सर्व प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे.झाडांच्या कत्तलमुळे दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी-कमी होत आहे याचे भान नाशिक मनपा व राज्य सरकारांने ठेवले पाहिजे. सरकारला ग्यात आहे की करोणा काळात ऑक्सिजनसाठी किती वनवन हिंडावे लागत होते आणि आता नाशिककरांना १८०० वृक्ष मानव, पशुपक्षी व तेथील संपुर्ण जीवजंतूना शुद्ध ऑक्सिजन व हवा देण्याचे काम करीत आहेत त्यावर जर आपण कुह्राड मारत असाल तर ही वृक्षांची,मानवाची,पशुपक्षांची व जीवजंतूंची खुली हत्याच म्हणावी लागेल. त्यामुळे सावधान नाशिक मनपा प्रशासन व सरकार आपण जर चुकीचे पाऊल उचलले तर आपल्याला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.सरकारने व नाशिक मनपा प्रशासनाने नाशिककरांच्या भावना, पौराणिक कथांचे वास्तव, निसर्गाची ढासळती परिस्थिती व बदलते हवामान या संपूर्ण बाबींचा गांभीर्याने विचार करावा व १८०० झाडांच्या कत्तलीचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा अन्यथा याचे प्रायश्चित्त भोगण्यास मनपाने व सरकारने तयार रहावे.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# निरपेक्ष प्रेम हीच वंचितांची ऊर्जा आणि प्रेरणा: ठाकुर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** ज्ञान किंवा उपदेशापेक्षा वंचितांना प्रेमाचा स्पर्श आणि आपुलकी यांची गरज असते. निरपेक्ष प्रेम हीच वंचितांची वास्तविक ऊर्जा आणि प्रेरणा असल्याचे स्नेहालयाच्या आजवरील कामाने सिद्ध केले असल्याचे प्रतिपादन नेदरलँड येथील समाजसेवक गिरीश ठाकुर यांनी केले.

वंचितांसाठी स्नेहालय संस्थेत नव्याने बांधण्यात आलेल्या कर्मयोगिनी साधनाताई आणि महामानव बाबा आमटे भवनाचे लोकार्पण आज झाले. त्यासाठी मदत देणारे द नेदरलँड येथील आधार फॉर यू संस्थेचे संस्थापक सौ.वृंदा आणि गिरीश ठाकूर , नगर जिल्ह्याचे भुमिअभिलेख विभागाचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ, नगरचे पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, फोरकस इम्पेक्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश जग्गी, अहिल्यानगर मधील औद्योगिक क्षेत्राचे पालक आणि प्रमुख मार्गदर्शक अरविंद पारगावकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी यावेळी उपस्थित होते.

श्री.ठाकूर म्हणाले की, अनाथ मुलांच्या संस्थेत राहणाऱ्या मुला मुलींचे प्रश्न त्यांच्या वयाच्या १८ वर्षांनंतर गंभीर होतात. त्यातही एचआयव्ही बाधित आणि विविध स्वरूपाची व्यंग असणाऱ्या बालकांना आजही अस्पृश्यतेची वागणूक मिळते. अशा स्थितीत अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये १८ वर्षांवरील मुलामुलींसाठी आणि येथील सेवाव्रती यांच्या निवासाकरिता स्नेहालयाने लोकसहभागातून उभारलेले १५ हजार चौरस फुटांचे सुसज्ज संकुल परिवर्तनाचे केंद्र ठरेल.

श्री. मिसाळ आणि डॉ. टिपरसे या दोघांनीही नमूद केले की , स्पर्धा परीक्षेची तयारी करत असल्यापासून स्नेहालयाबद्दल सातत्याने ऐकले . परंतु प्रत्यक्ष काम पाहिल्यावर कामाची खोली आणि व्याप्ती समजली. आपले माजी विद्यार्थी आणि लाभार्थी यांना सक्षम करून त्यांच्याकडेच संस्थेचे सुकाणू सोपविणारी स्नेहालय संस्था निरपेक्ष सेवाकार्याचा दीपस्तंभ असल्याचे संस्थेच्या अध्यक्षा जया जोगदंड यांनी नमूद केले.

स्नेहालय ची विद्यार्थिनी कुमारी साक्षी नरवडे हिने बाबा आमटे यांचे *शृंखला पाय असू दे ,मी गतीचे गीत गाई* आणि *थांबला ना सूर्य कधी थांबली न धारा* ही प्रेरणागीते सादर केली. डॉ.प्रीती भोम्बे, गीता कौर,संस्थेचे मुख्य पालक मिलिंद एकनाथ कुलकर्णी, राजीव गुजर, संजय बंदिष्टी यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

संस्थेचे संचालक अनिल गावडे यांनी प्रास्ताविक तर एडवोकेट शाम आसावा यांनी आभार प्रदर्शन केले सौ. स्वाती रानडे यांनी सूत्रसंचालन केले.

# शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी 'स्लॉट बुकिंग' अनिवार्य

**स्लॉट बुकिंग करून कापूस खरेदी केंद्रावर आणावा.**

कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी स्लॉट बुकिंग करून कापूस शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर आणावा. सदरील केंद्राच्या क्षमतेपेक्षा अधिक कापूस नोंद झाल्यास यावर जागा उपलब्ध नाही, असा संदेश दिसेल. नोंदी संख्या जास्त असल्यास यावेळी शेतकऱ्यांनी पर्यायी तारखेचे स्लॉट बुक करावे, त्यानंतर संबंधित केंद्रात कापूस विक्री करता येईल

**काकासाहेब तापकीर**
**सभापती – कृ.उ.बा समिती, कर्जत तालुका**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**मिरजगाव :** कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( सीसीआय) अर्थात भारतीय कापूस प्राधिकरण अंतर्गत किमान आधारभूत दरानुसार शासकीय कापूस हमीभाव खरेदी केंद्राकडे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी जाण्यापूर्वी आता स्लॉट बुक करणे अनिवार्य करण्यात आले असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत तालुका यांच्याकडून देण्यात आली आहे.

त्यामुळे आता कापूस उत्पादक



शेतकऱ्यांना स्लॉट बुकिंग केल्यानंतर कापूस विक्री करता येणार आहे

यांकरिता सर्व शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत यांच्याशी संपर्क करून आपला कापूस शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर आणावा. तसेच ज्या दिवशी शासकीय कापूस खरेदी केंद्रावर कापूस विक्रीचा सलॅट बुकिंग केला आहे. त्याच दिवशी आपली गाडी आणावी. काही कारणास्तव गाडी आणणे नाही जमल्यास तो स्लॉट बुक कॅन्सल करून ज्या दिवशी गाडी येईल, त्याच दिवशी नवीन स्लॉट बुकिंग आपल्या स्मार्ट फोनद्धे 'कपास किसान' ॲप मधून स्लॉट बुकिंग करावी, असे आव्हान करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांना 'कपास किसान' ॲप ठरणार फायदेशीर !**

आता कापूस उत्पादक शेतकरी थेट खरेदी केंद्रांवर जाऊन रांगेत उभे राहण्याऐवजी या ॲपद्वारे त्यांचे पीक विकण्यासाठी स्लॉट बुक करतील. त्यांना प्रथम त्यांची वैयक्तिक माहिती आणि पीक तपशील प्रविष्ट करावे लागतील. आणि त्यानंतर नियोजित वेळी केंद्रावर पोहोचून ते विकावे लागणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना तासन्तास वाट पाहावी लागणार नसून रांगेत उभे राहण्याची व वेळेची बचत होणार आहे. आणि घरबसल्या नोंदणी करणे शक्य होईल. 'कपास किसान' ॲप हा शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणार आहे.

# दखल

## कवाद मळ्यात दत्त जयंती उत्सवाचे आयोजन

**निघोज:** कै. शंकर आप्पा कवाद यांनी ४६ वर्षांपूर्वी सुरू केलेला दत्त जयंती उत्सव आजतागायत सुरु असून कवाद मळ्यातील कवाद भावकी परिसरातील ग्रामस्थ , दत्त कृपा गणेश मंडळ यांनी एकत्र येऊन दि.४ डिसेंबर गुरुवार रोजी हा दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करणार आहेत. यावेळी कवाद भावकी व परिसरातील ग्रामस्थ यांच्या हस्ते सकाळी १० ते १२ वाजता दत्त गुरु यांचा अभिषेक सोहळा व पुजा विधी संपन्न होणार असून त्यानंतर सायंकाळी सहा ते सात वाजता पोपट महाराज देशपांडे यांचे प्रवचन होणार आहे. सायंकाळी ७ ते ७.३० महाआरती, रात्री ७.३० ते ९ महाप्रसाद त्यानंतर शाहिर मुरलीधर सुपेकर यांचा भेदीक कार्यक्रम होणार आहे. रात्री ९ ते ११ या वेळेत शिवकृपा भजनी मंडळ शिववाडी यांचे संगीत भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कवाद भावकीचे ज्येष्ठ कारभारी शंकर आप्पा कवाद व त्यांचे चिरंजीव गंगारामशेठ कवाद यांनी ४६ वर्षांपूर्वी छोटेसे दत्त मंदीर बांधकाम करीत या ठिकाणी दत्त जयंती सोहळा सुरू केला आहे. तो आजतागायत सुरू राहण्यासाठी व हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी कवाद भावकी व परिसरातील ग्रामस्थ तसेच दत्त कृपा गणेश मंडळ प्रयत्नशील असून फार मोठ्या संख्येने भावीक या ठिकाणी दर्शनासाठी जात असतात. या दत्त जयंती उत्सवाचा भावीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्त कृपा गणेश मंडळ व ग्रामस्थ यांनी केले आहे.



## सहकारी बँकेच्या व्हा. चेअरमनपदी प्रा. माणिक विधाते

**अहिल्यानगर :** अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हा. चेअरमन पदी प्रा. माणिक विधाते यांची संचालक मंडळांनी एकमताने बिनविरोध निवड केली असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी काम पाहिले, प्रा. माणिकराव विधाते यांच्या व्हाइस चेअरमन पदाच्या नावाची सूचना संचालक निखिल नहार यांनी मांडली. तर अनुमोदन संचालक डॉ. भूषण अनभुले यांनी दिले, यावेळी बँकेचे चेअरमन सीए गिरीश घैसास, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, अशोक कानडे, संजय घुले, सुजित



बेडेकर, शिवाजी कदम, संचलिका रेश्मा आठरे, स्वाती कांबळे, संचालक डॉ. भूषण अनभुले, प्रदीप जाधव, दत्तात्रय रासकोंडा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, कर्मचारी प्रतिनिधी संतोष मखरे, राजेंद्र गायकवाड, वरिष्ठ अधिकारी प्रकाश वैरागर, वरिष्ठ लिपिक महेश पालवे व देविदास पारधे, अनिल मुरकुटे गणेश गोडाळ आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी प्राध्यापक माणिकराव विधाते यांची अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमन पदावर निवड झाल्याबद्दल सत्कार करून अभिनंदन केले

प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, शहर सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने व्हाईस चेअरमन पदावर माझी निवड केली त्या निवडीला सार्थ ठरवीत बँकेच्या हितासाठी चांगले काम केले जाईल, शहर सहकारी बँकेला ५४ वर्षाची उज्वल परंपरा आहे, अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे शहर बँकेशी ऋणानुबंध जोडले आहेत, असे ते म्हणाले.

यावेळी चेअरमन सीए गिरीश घैसास व संचालक मंडळांनी निवडीबद्दल अभिनंदन व्यक्त केले.

## निवडणुकीत मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; ७५टक्के मतदान

**जामखेड** - जामखेड नगरपरिषद पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज (दि.२ ) सुरू असलेल्या मतदानासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत होता सकाळपासूनच मतदान केंद्रांवर रांगा लागलेल्या दिसून आल्या आहेत. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी तरुणांसह वृद्ध मतदारांचीही विशेष उपस्थिती पाहायला मिळाली. सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या दरम्यान ७५ टक्के मतदान झाले आहे.

नगरपरिषदेच्या सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीत नगरसेवकपदाच्या २२ जागांसाठी तसेच नगराध्यक्षपदाच्या एका जागेसाठी ४१ मतदान केंद्रावर मतदान होते . उमेदवारांचे प्रतिनिधी पक्षाचे नेते कार्यकर्ते यांनी गर्दी केली होती. पोलिस प्रशासनाकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ल ना होशिंग विद्यालयात सर्वाधिक मतदान केंद्राबाहेर मोठी गर्दी झाली होती. शहरातील प्रत्येक केंद्रावरती गर्दी होती. नगरपरिषदे साठी सकाळी साडेअकरा वाजता २७. ४३ टक्के मतदान झाले आहे.दुपारी दीड वाजेपर्यंत ४३. ३७ टक्के मतदान झाले आहे.. दुपारी तीन वाजेपयंत ५८.७९ टक्के मतदान झाले आहे. पुढे सायंकाळी ४ नंतर काही मतदान केंद्रावर गर्दी वाढली होती त्यावेळी मतदान उशिरा पर्यंत चालू होते त्यामुळे जवळपास ७५ टक्केच्या पुढे मतदान झाले आहे

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी नगरपरिषद प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी उत्तम नियोजन केले आहे. दिव्यांग आणि वृद्धांसाठी व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, सावलीची सोय, स्वतंत्र रांगेची व्यवस्था अशा सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. किरकोळ अपवाद वगळता सर्व मतदान केंद्रांवर शांततेत आणि संयमाने मतदान प्रक्रिया सुरू असून, कुठलीही अनुचित घटना घडलेली नाही.

लोकशाहीच्या सन्मानार्थ मतदारांचा वाढता सहभाग समाधानकारक असल्याचे प्रशासनाने सांगितले. संध्याकाळपर्यंत मतदानाचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मतदान केंद्रावर सुरक्षा तसेच शहरात सुरक्षेसाठी पोलिस अधिकारी व कर्मचारी आहेत. यामध्ये राज्य राखीव पोलिस दल, आरसीपी, पोलिस दल, होमगार्ड आदी तैनात आहेत.




# राष्ट्रीय स्पर्धेसाठी रुपीबाई मोतीलाल बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या दोन खेळाडूंची निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**अहिल्यानगर :** रुपीबाई मोतीलाल बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या शालेय खेळाडूंनी इंदापूर येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धे त शहरातील विद्यार्थ्यांनी प्रभावी कामगिरी करून जिल्ह्याचा मान उंचावला आहे. विद्यालयातील तीन विद्यार्थी आरुषी लांडगे, सार्थक तनपुरे आणि युवराज आव्हाड यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

१४ वर्षाखालील मुलांच्या ५० किलो वजन गटात युवराज आव्हाडने अत्यंत दमदार खेळ सादर करत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. कोल्हापूर, मुंबई, सातारा आणि बीडच्या दिग्गज खेळाडूंना पराभूत करत त्याने विजेतेपदाची नैपुण्यपूर्ण कामगिरी केली. त्याच्या या कामगिरीच्या आधारावर त्याची



उत्तर प्रदेशातील सारंगपूर येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सार्थक तनपुरेने १४ वर्षाखालील मुलांच्या ५५ किलो वजन गटात उत्कृष्ट खेळ करत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. मुंबई, बीड आणि सोलापूरच्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत त्याने सुरुवातीपासूनच आघाडी राखली होती.

विद्यालयातील रुद्र मनोहर गायकवाड याने १७ वर्षाखालील मुलांच्या राज्य पॅरालिम्पिक स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले. अथलेटिक्समधील १०० मीटर आणि २०० मीटर धावण्याच्या दोन्ही उपांत्य फेऱ्यांत रुद्रने प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधले. त्याच्या या दुहेरी कामगिरीमुळे त्याची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरालिम्पिक स्पर्धे साठी निवड झाली आहे.

या सर्व यशस्वी खेळाडूंचा संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे कौतुक करत राष्ट्रीय स्तरावरही उत्तुंग यश मिळवल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, नियामक मंडळाचे चेअरमन अशोक मुथा, शाळा समितीचे चेअरमन भूषण भंडारी, सदस्य गौरव मिरीकर, विश्वस्त सुनंदाताई भालेराव, मुख्याध्यापक अजय बारगळ, उपमुख्याध्यापक आर. एन. भांड व पर्यवेक्षक व्ही. बी. गिरी यांनी या खेळाडूंसह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा शिक्षिका अंजली देवकर आणि अमोल धानापूर्ण यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्पर्धा पर्यंत मजल मारली आहे.

## २ लाखांचा चायना मांजा जप्त; एकास अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**अहिल्यानगर:** मकर संक्रांतीला अद्याप अवधी असला तरी आकाशात पतंग फडकू लागले आहेत. त्याचबरोबर मानवी जीवन, पशु, पक्षी यांच्यासाठी घातक्म ठरणारा नायलॉन-प्लास्टिक-चायना मांजाही आढळू लागला आहे.पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अहिल्यानगर शहरातून १ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. यासंदर्भात एका विक्रेत्याला अटक करण्यात आली आहे.

नायलॉन मांजाची विक्री करण्यास राज्य सरकारने मनाई केलेली आहे. अहिल्यानगर महापालिकेने ठराव करूनही या मांजाची विक्री करण्यास बंदी घातलेली आहे. नायलॉन मांजामुळे दरवर्षीच अनेकजण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पक्षी, प्राणी यांच्या जीवितसाठी हा नायलॉन मांजा घातक ठरतो आहे. मात्र तरीही नायलॉन मांजाची सर्रासपणे विक्री होते. विक्रेतेही ओळखीच्या छोट्या व्यावसायिकांना आणि छोटे व्यावसायिक ओळखीच्या ग्राहकांना गुपचूप नायलॉन मांजा उपलब्ध करतात.

मानवी जीवित्तासह पक्षी, प्राणी यांना इजा करणारा नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी संक्रांतजवळ आल्यामुळे अशा कारवाईसाठी विशेष पथक स्थापन केले आहे. त्यामध्ये पोलिस अंमलदार सुनील पवार, संतोष खैरे, गणेश धोत्रे, शाहिद शेख, दीपक घाटकर, वीरप्पा करमल, महिला पोलीस सोनाली भागवत यांची नियुक्ती केली आहे. हे पथक शहरात फिरत असताना केडगाव उपनगरातील लिंक रस्त्यावर एका दुचाकीवरून एक व्यक्ती दोन बॉक्स घेऊन जात असताना आढळला. पोलिसांनी त्याला थांबून बॉक्सची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ११० नग मोनो काईट, मोनो फायटर व गोल्ड या नावाचा प्लॅस्टिक-नायलॉन मांजा ११० नग आढळला.

# १५ संतांच्या आरती संग्रहाचे नगर येथे प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**करंजी :** धारवाडी ता. पाथर्डी येथील भगवानदास घुगे या वारकरी संप्रदायाच्या भक्ताने सुमारे १५ साधू संतांच्या आरती लिहून त्या प्रकाशित केल्या असुन ११वी आवृत्ती नुकतीच प्रकाशीत करण्यात आली.

भगवानदास घुगे (शास्त्री ) यांना प्रथमपासूनच अध्यात्माची आवड होती. त्यामुळे लिखाणाचीही आवड निर्माण झाली. ३५ वर्षापूर्वी पहिल्यांदा संत वामनभाऊ या समकालीन संतांची आरती लिहीली.ती सर्व सामान्य भाविकांना आवडली व त्यानंतर त्यांनीं अनेक संतांच्या आरती लिहिल्या. संस्कृत भाषाभिज्ञ हि पदवी घेतल्या नंतर घुगे यांनी बंगाल विद्यापीठातून शास्त्री ही पदवी घेतली. संत वामन भाऊ यांची आरती प्रथमतः लिहिली चांगलीच गाजली त्यानंतर अनेक महाराजांच्या राष्ट्रसंत तनपुरे महाराज, .उंबरेकरकर महाराज, निगमानंद महाराज, भगवान बाबा , संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज , बळीराजा , नामदेव




महाराज, संतशेख मोहम्मद महाराज आदि संतांच्या आरत्या त्यांनी स्वतः लिहिलेल्या आहेत.

घुगे शास्त्रींचे अनेक साहित्य प्रसिद्ध घुगे यांनी खुप लिखान केले असून त्यामध्ये संत वामनभाऊ प्रासादिक भजनावली , श्री गुरु विश्राम महाराज जीवन दर्शन, सनातनी बुवाबाजी वारकरी धर्म , माझी जीवन यात्रा , संत मच्छिंद्रनाथ भाऊ जीवन चरित्र , भटाळलेले वारकरी , संत्रचिरीत्राचे हनन ' मोक्षाचा असंभव , प्रेम पाश नाटक व आरती संग्रह भजनमाला अशी सुमारे अकरा पुस्तक रुपी साहित्य त्यांनी लिहिलेले आहे.

आज अध्यात्माच्या दृष्टीने त्यांनी उत्कृष्ट कार्य केले त्याबद्दल त्यांना समाजभूषण प्रबोधनकार , संतभूषण , संत साहित्य समीक्षक , आदि राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. आगामी काळातही संत साहित्य मोठ्या प्रमाणावर आपण लिहिणार असल्याचे यावेळी घुगे यांनी सांगितले.

आरती म्हणजे परिपूर्णता, आरती म्हणजे समाधान , आरती म्हणजेच कार्याचे समापन , आरती म्हणजेच त्या संत महात्मा च्या कार्याची परिपूर्णता होय म्हणून मी आरती करण्याचा संकल्प केला आहे .

**भगवानदास घुगे**
**( लेखक, कवि धारवाडी ता . पाथर्डी )**

## निर्मलाताई काकडे कॉलेजमध्ये शोध निबंध लेखन कार्यशाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**ढोरजळगांव:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या निर्मलाताई काकडे आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.ए. दुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली २ डिसेंबर रोजी 'शिक्षक प्रशिक्षण व संशोधन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा मुख्य विषय ''शोध निबंध लेखन'' हा होता.

या महत्त्वपूर्ण कार्यशाळेसाठी प्रा. सोपान नवथर हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. प्रा. नवथर यांनी 'सामाजिक शास्त्रातील संशोधन' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधनाचे मूलभूत टप्पे व बारकावे स्पष्ट केले. संशोधनाचे



स्वरूप: 'संशोधन म्हणजे काय?', 'संशोधकासाठी आवश्यक असणारे गुण', तसेच 'विषय निवडण्याची योग्य पद्धत' यावर त्यांनी प्रकाश टाकला. संशोधनाचे वैचारिक प्रवाह: राष्ट्रवादी, साम्राज्यवादी, मार्क्सवादी, उपयुक्ततावादी यांसारख्या प्रमुख विचारधारेचा संशोधनावर कसा प्रभाव पडतो, हे त्यांनी स्पष्ट केले. संशोधनाचे प्रकार व पद्धती: त्यांनी मूलभूत संशोधन, सामान्यकरणात्मक संशोधन, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती, मुलाखत पद्धती आणि संदर्भ पद्धती या प्रमुख संशोधन पद्धतींची माहिती दिली. शोध निबंध व शोध प्रबंधाची रचना – शीर्षक (जसे की, गोषवारा, प्रस्तावना, निष्कर्ष), संशोधन आराखडा आणि पुस्तक परीक्षण यातील आवश्यक घटकांचे त्यांनी तपशीलवार विश्लेषण केले.

## श्रीगोंदा नगरपरिषदेसाठी सरासरी ६५ टक्के मतदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**श्रीगोंदा** ;- श्रीगोंदा नगरपरिषदेची निवडणूक तालुक्यातील नेत्यांनी आपल्या अस्तित्वाची बनवली असल्यामुळे अनेकांचे या निवडणुकीकडे लक्ष लागले होते . मंगळवारी मतदान पार पडले असून सरसरी ६५ टक्के मतदान झाले असून किरकोळ गोष्टी वगळता सर्व ठिकाणी मतदान शांततेत पार पडले आहे.

श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीत १ नगराध्यक्ष आणि २१ नगरसेवक पदासाठी आज निवडणूक पार पडली. यामधील प्रभाग क्रमांक ७ ब यामध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकानुसार स्थगिती मिळाल्याने एका जागेसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. आज पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेमध्ये सुरवातीपासून हाय व्होल्टेज ड्रामा पाहण्यास मिळाला मात्र दुपारी तीन वाजे पर्यंत मतदानाची टक्केवारी अल्प प्रमाणात असल्यामुळे मतदान केंद्रावर कमी प्रमाणात गर्दी दिसत होती मात्र सायंकाळी अचानक मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली त्यामुळे काही ठिकाणी उशिरापर्यंत मतदान सुरू होते यासाठी मोठ्या



प्रमाणात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता मतदान सुरू असताना भाजपाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी फटाक्याची आतिषबाजी करत गुलालाची उधळण केल्यामुळे सगळीकडून मोठ्या प्रमाणात चर्चे चा विषय बनला होता मात्र हा जल्लोष २१ तारखेच्या निकालात कायम राहणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात होता .

महाविकास आघाडीची वाताहत कोणाच्या पथ्यावर जाणार ? सुरवातीला निवडणुकीत जोमाने उतरलेली महाविकास आघडीच्या उमेदवारांनी निवडणुकीच्या आगोदर रात्री विरोधी पक्षातील उमेदवारांना अचानक पाठींबा दिल्या.

# बिबट्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या रियंका पवारच्या कुटुंबाला १० लाखांचा धनादेश सुपूर्द

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**पारनेर** :- सोमवार दि. १ डिसेंबर कर्जुनेखारे, ता. नगर येथे घडलेल्या बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनेनंतर रियंका सुनील पवार (वय ६ वर्षे) हिच्या कुटुंबाला तातडी आर्थिक आधार म्हणून १० लाख रुपयांचा धनादेश आज आमदार . काशिनाथ दाते यांचे सुपुत्र उद्योजक दिलिप दाते यांच्या हस्ते साजल गायकवाड व रोहिदास गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या मदतीमुळे दुःखी कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला.

ही भयावह घटना १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.१० ते ७.२० या वेळेत घडली, जेव्हा बिबट्याने रियंकाला घराजवळून उचलून नेले. घटना समजताच आमदार काशिनाथ दाते तात्काळ रात्री



११ वाजता घटनास्थळी पोहोचले होते. त्यांनी पीडित कुटुंबाला धीर देत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना बिबट्या पकडेपर्यंत गाव सोडायचे नाही अशा कठोर सूचना दिल्या होत्या आणि शोध मोहीम तत्काळ सुरू केली होती.

सोमवार, १ डिसेंबर रोजी आर्थिक मदत सुपूर्द करताना उद्योजक दिलीपशेठ दाते यांच्या समवेत माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, अंबादास पाटील शेळके, रशिद सय्यद, कैलास लांडे, भाऊसाहेब महांडुळे, सरपंच प्रभाकर मगर, उपसरपंच रामेश्वर निमसे, बाळासाहेब निमसे, संजू बोरुडे, किरण वाघ, विकास निमसे, योसेफ बोरुडे, जानभाई सय्यद, ग्रामसेवक डेरे मॅडम, वनविभाग अधिकारी अविनाश तेलोरे, गायकवाड सर, धोत्रे सर, ग्रामसेविका पुष्पावती डेरे, कम. तलाठी संजय आडोळे यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संबंधित घटनेनंतर खारे कर्जुने परिसरात बिबट्याची शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून सुरक्षेसाठी विशेष उपाय राबविण्यात येत आहेत.

''कर्जुनेखारे येथे घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावणारी आहे. एका निरागस चिमुरडीचा जीव जाणे हे संपूर्ण मतदारसंघासाठी मोठे दुःख आहे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी वनविभागासोबत समन्वय साधून आवश्यक सुरक्षा उपाय तात्काळ राबवले जात असुन गावोगावी प्रकाश व्यवस्था, फॉरेस्ट पेट्रोलिंग व तातडीने पिंजरे बसविण्याचे निर्देश दिले असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत.''

**आमदार काशिनाथ दाते**
**(विधानसभा सदस्य)**

बिबट्या हल्ल्यात मयत झालेल्या रियंका पवार हिच्या परिवारासाठी जी तातडीची मदत पोहच झाली त्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माहिती मिळताच तत्परतेने मदत करणारे आमदार काशिनाथ दाते यांचे खारे कर्जून ग्रामस्थांकडून कडून आभार.

**अंबादास पाटील शेळके,**
**खारे कर्जुने**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## बिबट्याच्या हल्ल्यात ७० वर्षीय महिलेचा मृत्यू

**पारनेर** : तालुक्यातील किन्ही गावाजवळ मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी सुमारे ४ वाजता शेतात काम करत असताना बिबट्याच्या हल्ल्यात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. मयत महिलेचे नाव भागूबाई विश्वनाथ खोडदे (वय ७०, रा. किन्ही, ता. पारनेर) असे आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, भागूबाई या आपल्या शेतात एकट्याच काम करत होत्या. अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्याची तीव्रता इतकी होती की, त्यांना वाचवण्यासाठी कोणीही पोहोचू शकले नाही आणि जागीच त्यांचा मृत्यू झाला. ग्रामस्थांनी आरडाओरड केल्यावर बिबट्या जंगलाकडे पळाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवचिकित्सेसाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. याप्रकरणी पारनेर पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद झाली. किन्ही परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या हालचाली वाढल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही जनावरे मारण्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली असून ग्रामस्थांनी वन विभागाकडे तात्काळ बिबट्या पकडण्याची मागणी केली आहे.



# श्रीरामपूर पालिकेसाठी उत्साहात मतदान

## लक्ष्मी दर्शन उशिरा झाल्याने रात्री उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मोठ्या प्रतीक्षेनंतर एकदाचे नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीचे मतदान उत्साहात पार पडले. रात्री उशिरापर्यंत मतदानाची आकडेवारी उपलब्ध झाली नाही मात्र सुमारे ६५टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. मात्र मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याने निवडणुकीचा निकाल लाभल्याने अनेक मतदारांनी तसेच उमेदवार व कार्यकर्ते यांनी नाराजी व्यक्त केली. सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. मात्र थंडीमुळे मतदार बाहेर पडले नाहीत. त्यामुळे सकाळी ११ वाजेपर्यंत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांचा अत्यल्प प्रतिसाद होता.

साडेअकरापर्यंत शहरात फक्त पंधरा टक्के मतदान झाले होते.त्यानंतर मतदानाचा टक्का वाढायला सुरुवात झाली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुमारे ५५ टक्के मतदान झाले होते. परंतु शहरातील अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.रात्री उशिरापर्यंत तेथे मतदान सुरू होते.प्रशासनाकडून ही बाब गृहीत धरून प्रत्येक ठिकाणी विजेची आणि इतर सोय करण्यात आली होती. काल सकाळी साडेसात वाजता प्रत्येक केंद्रावर मतदान सुरू झाले.





### चार हजार रोख चार हजारचे टोकन

शहरातील एका प्रभागामध्ये एका उमेदवाराने आपल्या मतदारांना प्रत्येक मतासाठी चार हजार रुपये रोख दिले तसेच पुढे चार हजार रुपयांचे टोकन दिल्याची चर्चा तेथील मतदान केंद्रावर होती.

पटेल हायस्कूलमध्ये एका मतदान केंद्रावर गुलाबी रंगाच्या सखी मतदान केंद्राची उभारणी करण्यात आली होती. त्या ठिकाणी मतदान केंद्र अध्यक्ष,मतदान अधिकारी म्हणून सर्व महिला कर्मचारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.त्यांनी सर्वांनी गुलाबी पोशाख परिधान केला होता. केंद्राच्या आत व बाहेर गुलाबी पडदे लावण्यात आले होते.

प्रभाग सहासाठी संजय नगर परिसरातील अनिल मुळे शाळेमध्ये मतदारांच्या सकाळपासून रांगा लागल्या होत्या. मतदान केंद्रांवर मतदार यादी मध्ये अनुक्रमांकाचा गोंधळ झाल्याने सर्वच मतदारांना मनस्ताप झाला. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये प्रभागातील यादीनुसार अनुक्रम नंबर न घेता एक नंबर पासून सुरुवात केल्याने आपला नंबर कोणत्या यादीत आहे हे मतदारांना माहित होत नव्हते. त्यामुळे त्यांना प्रभागातील सर्वच मतदान केंद्रामध्ये जावे लागले.मतदान अधिकारी व कर्मचारी यांना देखील मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागले. मतदारांना बी एल ओ मार्फत घरपोच मतदानाच्या चिठ्ठ्या बऱ्याच भागात पूर्णपणे मिळाल्या नाहीत.एका बीएलओची नियुक्ती दोन ठिकाणी केल्याचे प्रकार समोर आले.

काही बिएलओना काम तर काहींना आराम असा प्रकार देखील झाला. दुपारी एक नंतर उन्हाचा चटका वाढल्याने बऱ्याच मतदारांना मतदान केंद्राच्या बाहेर उन्हात उभे राहावे लागले. श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी शाळेत ही परिस्थिती दिसून आली. दुपारी प्रभाग पाच,सात, आठ आणि मिल्लत नगर, संजय नगर परिसरातील प्रभाग क्रमांक सहा मध्ये मतदारांच्या मोठ्या रांगा दिसून आल्या होत्या. शाळा क्रमांक सहा मधील प्रभाग सातच्या मतदान केंद्रांवर दुपारी पावणे दोन वाजता मोठ्या प्रमाणात मतदार कार्यकर्ते यांची गर्दी झाली होती.तेथे पोलिस व कार्यकर्ते यांच्यात शाब्दिक चकमक झाली तसेच दोन गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याने पोलिसांना बळाचा वापर कार्यकर्ते व मतदार यांना पान व्हावे लागले. प्रभात सहा मध्ये संजय नगर मध्ये अनिल मुळे शाळेमध्ये दुपारी दोन वाजता मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. डीडी काचोळे विद्यालय येथे प्रभाग क्रमांक १४ आणि १६ चे मतदान बुथ होते.त्यामुळे येथे दुपारी साडेतीन वाजता प्रचंड गर्दी झाली होती. मतदान करून लोक मैदानातच थांबत असल्याने शेवटी पोलिसांना ध्वनीक्षेपकावरून सूचना देऊन मतदार मैदानाबाहेर काढावे लागले. नवीन मराठी शाळेमध्ये प्रभाग बारा च्या मतदान केंद्रांवर दोन महिला उमेदवारां च्या समर्थकांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याने दोन्हीकडचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते. त्यावेळी तातडीने पोलीस कुमक मागवून जमाव पांगवण्यात आला.

भि रा खटोड कन्या विद्यालय येथील प्रभाग तेराच्या मतदान केंद्रावर व्हीलचेअरची सुविधा नसल्याने मतदारांना रॅम्प वरून मतदान केंद्रात जाताना जाताना मोठा त्रास सहन करावा लागला. शांतीलाल पाटणी विद्यालय येथे प्रभाग क्रमांक नऊ आणि दहाच्या मतदारांची सायंकाळी पाच वाजता मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. मतदानासाठी लांबचलांब रांगा लागल्या होत्या. या ठिकाणी सायंकाळी उशिरापर्यंत मतदान सुरू होते. पाटणी विद्यालय येथे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या लोकांना काठीने मारले.त्यामुळे लोक चिडले होते. या निवडणुकीत ८० टक्के पेक्षा जास्त मतदान होईल अशी अपेक्षा होती.परंतु मयत, दुबार तसेच बाहेरगावी असणारे मतदार यांची मोठी संख्या मतदार यादीत असल्याने व त्याचा मतदानावर परिणाम झाल्याने टक्केवारी कमी झाल्याची चर्चा सर्वच भागात होती.

नगरपालिका निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी तथाप्रांत अधिकारी किरण सावंत पाटील,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मिलिंद वाघ तसेच मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी आपले सर्व क्षेत्रीय अधिकारी मतदान केंद्राध्यक्ष मतदान कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने अतिशय चांगले नियोजन केले होते. १३५ कॅमेरे लाऊन शहरातील सर्व ८९ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही च्या माध्यमातून सर्व मतदान केंद्रांवर नजर ठेवली जात होती व त्याचे नियंत्रण तहसील कार्यालयातून केले जात होते.ज्या ठिकाणाहून तक्रार प्राप्त होत होती त्या ठिकाणी तातडीने बदल करण्यात येत होते.

शहरातील एक दोन मतदान केंद्रावर उमेदवार व त्यांचे समर्थक यांच्यामध्ये मतदान केंद्राच्या बाहेर वादावादीचे किरकोळ प्रकार वगळता एकंदरीत मतदान शांततेत पार पडले.

## मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : उत्तरेकडील थंड वाऱ्यांचे प्रवाह धडकत असल्याने मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट कायम आहे. आज (ता. २) राज्यात अंशतः ढगाळ हवामानासह हुडहुडी कायम राहण्याचा अंदाज आहे. तर मध्य महाराष्ट्रात थंडीच्या लाटेची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. राज्यात हुडहुडी कायम असून, पहाटे धुक्यासह, दव पडत आहे. सोमवारी (ता. १) धुळे येथील कृषी महाविद्यालयात राज्यातील नीचांकी ७ अंश तापमानाची नोंद झाली. निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ७.७ अंश सेल्सिअस, तर परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात ८.४ अंश, तसेच जेऊर, अहिल्यानगर, पुणे, नाशिक येथे पारा १० अंश व त्यापेक्षा खाली आल्याने हुडहुडी वाढली आहे.

दरम्यान सोमवारी (ता. १) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये कोकणातील रत्नागिरी येथे ३४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. आज (ता. २) मध्य महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर जिल्ह्यांत थंडीची लाट येण्याची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. उर्वरित राज्यात गारठा कायम राहणार आहे.

### ‘डिटवाह’ चक्रीवादळ निवळले

बंगालच्या उपसागरातील ‘डिटवाह’ चक्रीवादळ निवळून गेले असून, त्याचे अवशेष असलेली वादळी प्रणाली (डीप डिप्रेशन) तमिळनाडूच्या किनाऱ्याजवळ सक्रिय आहे. या प्रणालीचे केंद्र चेन्नईपासून ५० किलोमीटर, पदुचेरीपासून १३० किलोमीटर पूर्वेकडे कुड्डालोरपासून १५० किलोमीटर ईशान्यकडे, नेल्लोरपासून २०० किलोमीटर दक्षिणेकडे होते. किनारपट्टीला समांतर मार्गक्रमण करताना या प्रणालीची तीव्रता ओसरून जाणार आहे. पूर्व किनाऱ्यावर ढगांची दाटी झाली असून, जोरदार पावसाच्या सरींची शक्यता आहे.

**थंडीच्या लाटेचा इशारा (येलो अलर्ट)** : नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर.

**राज्यात थंडी असलेली ठिकाणे** : धुळे ७, निफाड ७.७, परभणी (कृषी) ८.४, जेऊर ९, अहिल्यानगर ९.४, पुणे १०, नाशिक १०.

## अवैध वाळू तस्करीवर कारवाई

### महसूल पथकाची धाड, ७.५ लाखांचा ऐवज जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर नगरपालिका निवडणुकीत महसूल प्रशासन व्यस्त असतांना आश्वी पोलिस स्टेशन च्या हद्दीतील गावांन मध्ये प्रवरा नदीपात्रात वाळु तस्करांनी हैदोस घातला असुन या तस्करांन वर महसूल पथकाने शनिवारी रात्री कारवाई करत सुमारे साडे सात लाखाचा ऐवज जप्त करून आश्वी पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. संगमनेर तालुक्या चा पुर्व भागातील गावांमध्ये प्रवरा नदीपात्रातुन वाळुतस्करांनी अवैध रित्या वाळु उपसा सुरु केला असून.

वाळु तस्करांन कडुन सर्वसामान्य जनतेकडून मोठ्याप्रमाणात लुट सुरु झाल्याने शासकीय अवैध गौणखनिज वाहतूक आणि उत्खननावर कारवाई करण्यासाठी नेमलेल्या पथकाने शनिवारी उशिरा रात्री धाड टाकत एक विनानंबर टिप्परसह शासकीय वाळू ताब्यात घेतली. अंधाराचा फायदा घेऊन दोघे इसम मात्र घटनास्थळावरून पसार झाले. धोंडीबा बुधा भालचीम वय ५७ मंडळ अधिकारी-संगमनेर बु. हे मा. तहसीलदार, संगमनेर यांनी दिलेल्या आदेशानुसार गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील अवैध वाळू उत्खननावर नजर ठेवत आहेत.

शनिवारी दि. २९ नोव्हेंबर रोजी रात्री ११.२० वाजता मंडळ अधिकारी भालचीम, ग्राममहसूल अधिकारी राजेंद्र धोंडीराम पवार (सुकेवाडी) व अरबाज इनामदार (राजापूर) हे आश्वी बु. गावठाणाच्या उत्तर बाजूस-शाळेच्या पाठीमागील, मांची रोड परिसरात गस्त घालत होते. त्याचवेळी पिवळ्या रंगाचा हुड असलेला विना नंबरचा संशयित टिप्पर दिसताच पथकाने त्यास थांबवले. तपासणीदरम्यान टिप्परच्या मागील हौदात सुमारे दोन ब्रास वाळु आढळून आली. वाहतूक परवाना मागितल्यावर, टिप्परमध्ये असलेल्या दोघा इसमांनी परवाना नाही असे कबूल केले. मात्र पथक अधिक चौकशी करत असतानाच दोघेही अंधाराचा फायदा घेत पळून गेले. पाठलाग करूनही ते मिळून आले नाहीत.

त्यानंतर पथकाने सदर टिप्पर आश्वी पोलीस ठाण्यात जमा केला. जप्त केलेल्या वाहन व वाळूची अंदाजित एकूण किंमत सात लाख छप्पन हजार चारशे रुपये इतकी सांगितली जाते. यावेळी पथकाने पिवळ्या रंगाचा हुड असलेला विना नंबर टिप्पर चेसी क्रमांक एम एच टी ८६३०३५७सी वो ५४७७ अंदाजे किंमत सात लाख पन्नास हजार, शासकीय वाळू दोन ब्रास अंदाजे किंमत सहा हजार चारशे एकूण सात लाख छप्पन हजार चारशे रुपये असा ऐवज जप्त करुन आश्वी पोलीसांच्या ताब्यात दिला. या दोघा अनोळखी इसमांनी शासकीय वाळू विनापरवाना वाहतूक करत पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचे स्पष्ट झाल्याने मंडळ अधिकारी भालचीम यांनी आश्वी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली असून पोलीस पुढील तपास सुरू केला आहे.

## १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने इतिहास रचला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोलकाता** : १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीचे सय्यद मुश्ताक अली T२० ट्रॉफीत शतक पूर्ण करत. भारतीय क्रिकेटमध्ये सर्वात तरुण शतकवीर म्हणून इतिहास रचला. भारताचा उगवता क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याने आज (२ डिसेंबर) सय्यद मुश्ताक अली T२० ट्रॉफीत महाराष्ट्र संघाविरुद्ध खेळताना शतक झळकावत विक्रमी कामगिरी केली. कोलकात्यातील ईडन गार्डन्स मैदानावर त्याने ही ऐतिहासिक खेळी साकारली. केवळ १४ वर्षे २५० दिवसांचा असलेला वैभव T२० स्पर्धेतील भारताचा सर्वात तरुण शतकवीर ठरला आहे.



प्रथम फलंदाजी करताना बिहारने २० षटकांत ३ बाद १७६ धावा उभारल्या. यामध्ये वैभवने एकहाती ६१ चेंडूत नाबाद १०८ धावा ठोकल्या. त्याच्या डावात ७ चौकार, ७ षटकार यांचा समावेश होता. त्याने आपले शतक सामन्याच्या २० व्या षटकात पूर्ण केले. मागील तिन्ही सामन्यांत वैभवच्या खात्यात फक्त १४, १३ आणि ५ धावा जमा झाल्या होत्या. त्याच्याकडून एका मोठ्या खेळीची अपेक्षा होती आणि आज त्याने ती पूर्ण केली.

डावाच्या सुरुवातीला त्याने संयमाने खेळ करत नंतर जोरदार फटकेबाजी केली. यापूर्वीही त्याने रायझिंग स्टार्स आशिया कपमध्ये यूएईविरुद्ध केवळ ४२ चेंडूत १४४ धावा ठोकून चर्चे त आला होता. मॅचचा पहिला चेंडू खेळण्यापासून ते शेवटच्या चेंडूपर्यंत वैभव नाबाद राहिला आणि शतकी खेळीने भारतीय टी२० क्रिकेटच्या इतिहासात आपली नोंद सुवर्णाक्षरांनी केली.



काल शिर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदान केंद्रावरील गर्दी. (अशोक दुशिंग शिर्डी)



माजी खा. प्रसाद तनपुरे , डॉ. उषाताई तनपुरे व सोनाली तनपुरे यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. (छाया : राजेंद्र परदेशी)



माजी खा. डॉ. सुजय विखे यांनी मतदान केंद्रावर भेटी देत मतदारांचा उत्साह वाढवला



राहुरी येथील मतदान केंद्रावर लागलेल्या मतदारांच्या रांगा...(छाया : राजेंद्र परदेशी)

## आचारसंहिता शिथील करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग कोर्टात !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर** : राज्यातील २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी आज मतदान पार पडले, तर काही भागातील होणे बाकी आहे. आज नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या २६४ अध्यक्षपदांच्या आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी मतदानाची प्रक्रिया आज झाली. मात्र, मुंबई हायकोर्टाच्या नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठानं मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचे आदेश दिले आहेत.

यामुळे उद्या होणारी मतमोजणी लांबणीवर पडली आहे. राज्य निवडणूक आयोग आचारसंहिता शिथील करण्याच्या मागणीसाठी पुन्हा कोर्टात जाण्याच्या तयारीत असल्याची सूत्रांची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार राज्य निवडणूक आयोग आचारसंहिता शिथील करण्यासाठी कोर्टात जाण्याच्या तयारीत आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतीचे निकाल २१ तारखेला घोषित करावेत तसेच निकाल लागू होईपर्यंत आचारसंहिता कायम ठेवावी, असे आदेश कोर्टाने दिले आहेत. दरम्यान ज्या भागातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्या परिसरातील आचारसंहिता शिथिल करण्यासाठी आयोग परवानगी मागणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या या मागणीवर कोर्ट काय निर्णय घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसाठी आज मतदान पार पडलं. राज्य निवडणूक आयोगानं ४ नोव्हेंबरला २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र, काही ठिकाणची मतदानाची प्रक्रिया न्यायालयीन कारणांमुळं लांबणीवर टाकण्यात आली आहे. र

ाज्यातील १६ जिल्ह्यातील २४ नगरपरिषदा, नगरपंचायतींसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. तर, २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी आता २१ डिसेंबरला होणार आहे. २६४ नगरपरिषद आणि नगरपचंयातीच्या मतदानासाठी एकूण १२ हजार ३१६ मतदान केंद्रांसाठी ६२ हजार १०८ निवडणूक अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.